RNI NO. MAHMAR/2020/84035




BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ




रविवार, २२ जून २०२५ | वर्ष : ५ | अंक : १७५ | दैनिक | किंमत : ₹५/-

Sunday, 22 June 2025 | Year : 5 | Issue : 175 | Daily | Rate: Rs. 5/-

## दिल्लीत दोन सूत्रधारांना अटक

## 2,283 कोटी रूपयांचा गुंतवणूक घोटाळा



**नवी दिल्ली :** गेल्या काही वर्षांमध्ये देशात आर्थिक फसवणुकीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचे पाहायला मिळत आहे. गुन्हेगार वेगवेगळ्या पद्धतीने नागरिकांना लुटत आहेत. यादम्यान मध्यप्रदेश स्पेशल टास्क फोर्स (एसटीएफ) ने संपूर्ण देशभरात चालवला जाणारा अंदाजे 2,282 कोटी रूपयांचा गुंतवणूक घोटाळा उघड केला आहे. दरम्यान या गुन्ह्यातील प्रमुख सूत्रधार असलेल्या दीपक शर्मा आणि मदन मोहन या दोघांना पोलिसांनी दिल्लीहून अटक केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, यामध्ये सात राज्यातील हजारो गुंतवणूकदारांना बॉटब्रो सारख्या ऑनलाईन ट्रेडिंग प्लॅटफॉर्मच्या नावाखाली फसवण्यात आले आहे. हा प्लॅटफॉर्म शेल फर्ल यॉर्कर एफएक्स आणि यॉर्कर कॅपिटलद्वारे चारवला जात होता. तपासात माहिती समोर आली की आरोपी हा गुंतवणुकदारांचे पैसे Rainet टेक्नॉलॉजी प्रायव्हेट लिमिटेड आणि Kindent बिझनेस सॉल्यूशन्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्या खात्यात गोळा केले जात होते आणि नंतर फॉरेक्स ट्रेडिंगसाठी मेटा-5 खात्यातून हा पैसा यूएसडीमध्ये हस्तांतरित केला जात होता. एसटीएफने जवळपास 20 संशयास्पद बँक खात्यातील 90 कोटींची रक्कम गोठवली आहे. तसेच Kindent बिझनेस सॉल्यूशन्स प्रायव्हेट लिमिटेडने आर्थिक वर्ष 2023-24 मध्ये एमसीए (मिनिस्ट्री ऑफ कॉर्पोरेट अफेअर्स) कडे 1.10 कोटीचे ट्रायल बॅलेन्स जाहीर केले असल्याचेही तपासात समोर आले आहे. तर जानेवारी 2023 ते डिसेंबर 2024 पर्यंत त्यांच्या बँक खात्यांमध्ये झालेले प्रत्यक्ष व्यवहार सुमारे 7,020 कोटी रुपयांचे होते. याचप्रकारे Rainet टेक्नॉलॉजी प्रायव्हेट लिमिटेडने आर्थिक वर्ष 2023-24मध्ये ट्रायल बॅलेन्स 7.80 कोटी रुपये असल्याचा दावा केला, पण याच काळात त्यांचे व्यवहार हे 15,800 कोटी रूपयांचे झाले आहेत. एकत्रितपणे या दोन्ही कंपन्यांना 16 बँक खात्यांमध्ये अंदाजे 22,830 कोटी रुपये मिळाले, जे नंतर इतर अज्ञात खात्यांमध्ये हस्तांतरित केले गेले. दोन्ही कंपन्या आरबीआय किंवा सेबीकडे नोंदणी न करताच काम करत होत्या, ज्यामुळे अनेक आर्थिक आणि रेग्युलेटरी नियमांचे उल्लंघन झाले आहे. ईडी देखील फेमा कायद्याच्या अंतर्गत या प्रकरणाचा तपास करत आहे. याबरोबरच बॉटब्रो (BotBro) वेबसाईट देखील बंद करण्यात आली आहे. आरोपींनी मध्य प्रदेश, महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, राजस्थान, तामिळनाडू, हिमाचल प्रदेश आणि आसाम या राज्यांमधील लोकांची फसवणूक केल्याचे कबूल केले आहे.

### सरन्यायाधीश गवई यांच्या हस्ते 28 जूनला लोकार्पण

## देशातील पहिले संविधान प्रस्तावना पार्क नागपुरात



**नागपूर :** देशातील पहिले संविधान प्रस्तावना पार्क राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या अमरावती मार्गावरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयाच्या परिसरात उभारण्यात आले आहे. या संविधान प्रस्तावना पार्कचे लोकार्पण 28 जून रोजी देशाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या हस्ते होणार आहे. एकीकडे नागपूर विद्यापीठाने नुकतेच शताब्दी वर्ष साजरे केले, तर दुसरीकडे डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयाचे शताब्दी वर्ष साजरे होत आहे. अशा या सुवर्णमय योगात विदर्भाचे सुपूत्र सरन्यायाधीश गवई यांच्या हस्ते या संविधान प्रस्तावना पार्कचे लोकार्पण होणे ही ऐतिहासिक घटना ठरेल. या लोकार्पण समारंभाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. विधी महाविद्यालय परिसरात संविधान प्रस्तावना पार्कच्या उभारणीचा उद्देश पूर्ण होत आहे आणि या ऐतिहासिक घटनेचे साक्षीदार होण्याचा आम्हाला आनंद आहे, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयाचे प्राचार्य रविशंकर मोर यांनी नमूद केले. या संविधान प्रस्तावना पार्कला भेट देणाऱ्या लोकांना संविधानातील मूल्यांचे रक्षण करण्याची प्रेरणा मिळेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. दहा मूल्यांचे भित्तिचित्र संविधान प्रस्तावना पार्कच्या मध्यभागी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची संविधान हातात धरलेली प्रतिमा स्थापित करण्यात आली आहे. तसेच, यामध्ये सार्वभौमत्व, समाजवाद, धर्मनिरपेक्षता, लोकशाही, प्रजासत्ताक, सामाजिक न्याय, आर्थिक न्याय, राजकीय न्याय, स्वातंत्र्य आणि समता या संविधान प्रस्तावनेतील दहा मूल्यांचे भित्तिचित्र (म्यूरल) लावण्यात आले आहेत. लोकशाहीच्या आधारस्तंभांची प्रतिकृती या संविधान प्रस्तावना पार्कमध्ये लोकशाहीचे मुख्य आधारस्तंभ म्हणजेच राष्ट्रपती भवन, संसद भवन आणि सर्वोच्च न्यायालय यांच्या प्रतिकृती देखील तयार करण्यात आली आहेत. या संविधान पार्कमध्ये प्रवेश करण्यासाठी एक भव्य प्रवेशद्वारही उभारण्यात आले आहे.

## मेक इन इंडियावरून राहुल गांधींचा प्रधानमंत्री मोदींवर हल्लाबोल



**नवी दिल्ली :** काँग्रेसचे नेते तथा लोकसभेतील विरोधी पक्षनेते खासदार राहुल गांधी यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यावर मेक इन इंडिया उपक्रमावरून जोरदार टीका केली आहे. तसेच मेक इन इंडिया उपक्रमाच्या यशावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत. तसेच भारताच्या आर्थिक आव्हानांसाठी खऱ्या अर्थाने अंमलबजावणी करण्याऐवजी फक्त घोषणाबाजी करण्यावर केंद्र सरकार लक्ष केंद्रित करत असल्याचा आरोप खासदार राहुल गांधी यांनी केला आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे फक्त घोषणा करण्यात पुढे असल्याचंही राहुल गांधींनी म्हटले आहे. खासदार राहुल गांधी यांनी मेक इन इंडिया संदर्भात एक्सवर ट्विट करत म्हटले की, 'मेक इन इंडिया उपक्रमाच्या माध्यमातून कारखान्यांच्या उत्पन्नात वाढ होईल, तेजी येईल असं आश्वासन दिले होते. मग उत्पादन विक्रमी नीचांकी पातळीवर का आहे? तरुणांची बेरोजगारी का वाढली आहे? मग चीनमधून होणारी आयात दुप्पट का झाली आहे?', असे सवाल राहुल गांधी यांनी केंद्र सरकारला विचारले आहेत.

### निवडणूक आयोगाच्या नवीन नियमावर राहुल गांधी संतापले

**नवी दिल्ली :** लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी शनिवारी निवडणूक आयोगाच्या एका नवीन निर्णयावर तीव्र प्रश्न उपस्थित केले. राहुल गांधी म्हणाले की, निवडणूक आयोगाकडून उत्तरे मागितली जात असताना ते उलट पुरावे पुसून टाकत आहे. निवडणूक आयोगाने त्यांच्या अधिकाऱ्यांना 45 दिवसांनी निवडणुकीचे सीसीटीव्ही, वेबकास्टिंग आणि व्हिडिओ रेकॉर्डिंग नष्ट करण्याचे निर्देश दिले तेव्हा त्यांनी हे विधान केले. राहुल गांधींनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म - वर लिहिले, `मतदार यादी? मशीन-रीडेबल फॉरमॅट देणार नाही. सीसीटीव्ही फुटेज? कायदा बदलून ते लपवले. निवडणुकीचे फोटो आणि व्हिडिओ? आता 1 वर्षात नाही तर 45 दिवसांत डिलीट केले जातील. ज्याच्याकडून उत्तरे हवी होती तो पुरावे पुसून टाकत आहे.' त्यांनी पुढे लिहिले, हे स्पष्ट आहे की सामना फिक्स आहे. आणि फिक्स्ड निवडणूक लोकशाहीसाठी विष आहे. तुम्हाला सांगतो की राहुल गांधी बऱ्याच काळापासून निवडणूक आयोगाकडून मतदार यादी, निवडणूक डेटा आणि निवडणुकीशी संबंधित व्हिडिओ फुटेजची मागणी करत आहेत. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत हेराफेरी झाल्याचा त्यांचा आरोप आहे.

## इस्त्रायल-इराण संघर्षावर भारताचे मौन चिंताजनक : सोनिया गांधी



**नवी दिल्ली :** माजी काँग्रेस अध्यक्षा व ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी यांनी इस्त्रायल-इराण युद्धाबाबत केंद्र सरकारच्या भूमिकेवर टीका केली आहे. त्यांनी पश्चिम आशियातील विद्यमान स्थितीबाबत चिंता व्यक्त केली आहे. त्या म्हणाल्या, 'गाझा व इराणमधील विध्वंसावर नवी दिल्लीने शांत बसणे हे म्हणजे आपण आपल्या मूल्यांचा त्याग करणे आहे'. काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्षा सोनिया गांधी यांनी 'भारताचा आवाज ऐकायला अजूनही उशीर झालेला नाही' या शीर्षकासह एक लेख लिहिला आहे. यात त्यांनी म्हटले आहे की 'इस्त्रायलसह स्वतंत्र पॅलेस्टाइनची कल्पना करणाऱ्या शांततापूर्ण द्वीपक्षीय तोडग्याचे भारताने प्रदीर्घ काळापासून समर्थन केले आहे. मात्र, नवी दिल्लीने आपल्या तत्वनिष्ठ वचनबद्धतेचा त्याग केल्याचे दिसतेय'.
सोनिया गांधी यांनी दी हिंदूमध्ये लिहिलेल्या लेखात अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यावरही टीका केली आहे. ट्रम्प यांनी विध्वसंक मार्ग निवडल्याचे गांधी यांनी म्हटले आहे. सोनिया गांधी म्हणाल्या, 'गाझामधील विध्वंस व इराणमध्ये विनाकारण होत असलेले हल्ले पाहूनही नवी दिल्लीने त्यावर मौन बाळगणे म्हणजे आपल्या नैतिक व राजनैतिक परंपरांचा त्याग करत आपली मूल्ये सोडली आहेत असे दिसतेय. मात्र, अजूनही उशीर झालेला नाही. भारताने यावर स्पष्ट बोलले पाहिजे, जबाबदारीने वागले पाहिजे आणि पश्चिम आशियातील तणाव कमी करण्यासाठी, संवादाला सुरुवात करण्यासाठी उपलब्ध असलेल्या प्रत्येक राजनैतिक मार्गाचा वापर केला पाहिजे'. काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांनी म्हटले आहे की 'या मानवनिर्मित आपत्तीच्या पार्श्वभूमीवर नरेंद्र मोदी सरकारने भूमिका घेताना भारताची दीर्घकालीन तत्वनिष्ठ वचनबद्धता जवळजवळ सोडून दिली आहे. भारताने नेहमीच परस्पर सुरक्षितता व सन्मानाने इस्त्रायलच्या शेजारी राहणाऱ्या सार्वभौम, स्वतंत्र पॅलेस्टाइनची कल्पना केली आहे. मात्र, आपले विद्यमान सरकार यापासून विचलित झाल्याचे दिसतेय'. सोनिया गांधी यांनी म्हटले आहे की 'इस्त्रायलने 13 जून रोजी इराणवर हल्ला केला, त्याचे मध्य-पूर्वेत तीव्र पडसाद उमटू लागले आहेत. इस्त्रायलने इराणच्या भूमीवर केलेले हल्ले व बॉम्बस्फोटांचा भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने निषेध केला आहे. दुसऱ्या बाजूला केंद्र सरकारचे मौन खटकतेय. तसेच इस्त्रायलच्या गाझामधील क्रुर कारवायांमुळे तिथले नागरी जीवन उद्ध्वस्त झाले आहे. यामुळे अस्थिरता आणखी वाढेल आणि संघर्षाची बीजे पेरली जातील'. काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्षांनी इस्त्रायलचे प्रधानमंत्री बिन्यामिन नेतान्याहू यांच्यावरही टीका केली आहे.

## आता 'एमपीएससी'च्या अर्जासाठीही 'केवायसी'



**अमरावती :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी आता एमपीएससीने उपाययोजना आखण्यास सुरूवात केली असून भरती प्रक्रियेसाठी अर्ज करण्यापुर्वी उमेदवाराने आयोगाच्या अर्ज प्रणालीमधील खात्याची आधार व इतर पद्धतीने 'केवायसी' करणे अनिवार्य असणार आहे. प्रत्येक अर्ज भरण्यापुर्वी जर उमेदवाराने 'केवायसी' पडताळणी केली नाही, तर त्याला अर्ज भरता येणार नाही. त्यामुळे उमेदवाराला मनस्तापाला सामोरे जावे लागू शकते. यासंदर्भात 'एमपीएससी'ने माहिती पत्रक प्रसिद्ध केले आहे. शासन सेवेतील विविध पदभरतीकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून प्रसिध्द जाहिरातीस अनुसरुन अर्ज करण्याकरीता संबंधित उमेदवाराला प्रथम आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीच्या संकेतस्थळावर विहित पध्दतीने एक वेळची नोंदणी (वन टाईम रजिस्ट्रेशन) करावी लागते. तसेच विहित पध्दतीने नोंदणीनंतर संबंधित खात्यामध्ये (प्रोफाईल) अर्हतेसंदर्भातील विविध प्रकारचा तपशील नोंदवावा लागतो. आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीवर नोंदणीकृत उमेदवारांच्या ओळख पडताळणीकरीता उमेदवारांच्या खात्यामध्ये आधार क्रमांक नोंदविण्याची पध्दती व सुविधा मार्च 2017 पासून लागू करण्यात आली आहे.

## अहमदाबाद विमान अपघातानंतर DGCAची एअर इंडियाविरोधात कारवाई!



**अहमदाबाद :** अहमदाबाद येथे झालेल्या एअर इंडियाच्या विमान अपघातानंतर आता मोठी कारवाई करण्यात आली आहे. 12 जून रोजी झालेल्या या भीषण अपघातानंतर नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने (DGCA)ने एअर इंडियाला त्यांच्या तीन अधिकाऱ्यांना क्रु ड्यूटी शेड्यूल आणि रोस्टरसंबंधीत जबाबदाऱ्यांवरून हटवण्याचे आदेश दिले आहेत. हा आदेश 12 जून रोजी झालेल्या दुर्घटनेनंतर देण्यात आला आहे. या दुर्घटनेत 270 हून अधिक नागरिकांचा मृत्यू झाला होता. तसेच एअर इंडियाला असा इशाराही देण्यात आला आहे की, आगामी काळात तर क्रु शेड्यूलिंग नियम, लायसनिंग किंवा फ्लाइट टाईम मर्यादा यासंबंधी नियमांचे उल्लंघन करण्यात आले तर त्यावर कठोर कारवाई केली जाईल. यामध्ये दंड, परवाना रद्द करणे किंवा ऑपरेटर परवानग्या रद्द करणे यांचा समावेश असेल. म्हणजेच एकंदरीत जर अशा महत्त्वाच्या गोष्टींमध्ये चुका होत राहिल्या तर एअर इंडियाला टाळे लागू शकते असा गंभीर इशारा DGCAने दिला आहे. इतकेच नाही तर डीजीसीएने एअरलाईनला कारणे दाखवा नोटीस देखील बजावली आहे. एअर इंडियाला ठरवून दिलेल्या फ्लाइट ड्युटी टाइम लिमिटेशन (एफडीटीएल) नुसार वैमानिकांना 10 तासांपेक्षा जास्त वेळ उड्डाण करण्यास भाग पाडले आणि 16 आणि 17 मे रोजी बंगळुरू-लंडन या दोन उड्डाणे केली याबद्दल ही नोटीस बजावण्यात आली आहे

## मेळघाटात फिरत्या पथकाची चाकेच थांबली




**अमरावती :** पावसाळ्यात मेळघाटातील दुर्गम भागातील अनेक गावांचा जिल्ह्याशी संपर्क तुटण्याचा धोका असतो. अशा परिस्थितीत त्या त्या गावांमध्ये आरोग्य यंत्रणा सक्षम असणे गरजेचे आहे. गावांचा संपर्क तुटला तर गावांमध्ये असलेल्या गरोदर माता, कुपोषणाच्या 'सॅम' श्रेणीत असलेल्या बालकांच्या आरोग्याची निगा राखण्याचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. मात्र, दुर्गम गावात आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक पुरेशी यंत्रणा उपलब्ध नसल्याचे वास्तव समोर आले आहे.
मेळघाटात 7 फिरती आरोग्य पथके आहेत. पण, त्यांना उपलब्ध करून देण्यात आलेली वाहने ही एकाच ठिकाणी थांबून आहेत. या वाहनांचे टायर बदलण्यासाठी देखील आरोग्य विभागाकडे निधी नसल्याने आरोग्य कर्मचाऱ्यांवर ताण आहे. टायर बदलून घेण्यासाठी अकोला, मुंबई, पुणे येथील कार्यालयांवर विसंबून रहावे लागते. देखभाल-दुरूस्तीसाठी निधी मिळत नसल्याने या फिरत्या पथकांनी काम कसे करायचे, हा प्रश्न निर्माण झाला आहे.

## मोठ्या प्रमाणात डेटा उल्लंघनात 16 अब्ज पासवर्ड लीक...




**नवी दिल्ली :** एका मोठ्या डेटा उल्लंघनामुळे 30 डेटाबेसमधील 16 अब्ज लॉगिन क्रेडेन्शियल्स उघडकीस आले आहेत, ज्यामुळे फेसबुक, इंस्टाग्राम आणि जीमेल सारख्या प्रमुख प्लॅटफॉर्मच्या वापरकर्त्यांवर परिणाम झाला आहे. संशोधकांना अभूतपूर्व लीकचा शोध लागला, ज्यामुळे सायबर गुन्हेगारांसाठी ताजी, शस्त्रास्त्रे वापरता येणारी बुद्धिमत्ता उघड झाली. संभाव्य शोषण कमी करण्यासाठी तज्ञांनी त्वरित पासवर्ड बदल, बहु-घटक प्रमाणीकरण आणि खात्यांचे निरीक्षण करण्याची विनंती केली आहे. सुरक्षा संशोधकांनी 30 डेटाबेसमध्ये 16 अब्ज लॉगिन क्रेडेन्शियल्सचा समावेश असलेल्या अभूतपूर्व डेटा उल्लंघनाचा पर्दाफाश केला आहे, ज्यामुळे फेसबुक, इंस्टाग्राम, जीमेल, ॲपल आणि इतर असंख्य सेवांसह प्रमुख प्लॅटफॉर्मच्या वापरकर्त्यांवर परिणाम होण्याची शक्यता आहे. जानेवारी 2025 पासून सुरू असलेल्या तपासादरम्यान सायबरन्यूजच्या संशोधकांनी केलेला हा शोध इतिहासातील सर्वात मोठा क्रेडेन्शियल लीक असल्याचे दर्शविते. उघड झालेल्या डेटासेटचा आकार नाटकीयरित्या मोठा आहे, ज्यामध्ये लाखो रेकॉर्ड असलेल्या लहान संग्रहांपासून ते प्रत्येकी 3.5 अब्ज पेक्षा जास्त क्रेडेन्शियल्स असलेल्या मोठ्या डेटाबेसपर्यंतचा समावेश आहे. चोरीला गेलेला डेटा लॉक करण्यापूर्वी असुरक्षित डेटाबेसद्वारे थोड्या काळासाठी उपलब्ध होता, जरी संशोधकांना मालकांची ओळख पटवता आली नाही. सर्वात चिंताजनक बाब म्हणजे जवळजवळ सर्व डेटासेट पूर्वी अहवाल न दिलेले होते, मे महिन्यात वायर्ड मासिकाने यापूर्वी फक्त 184 दशलक्ष-रेकॉर्ड डेटाबेस उघड केला होता. या मोठ्या प्रमाणात डेटा चोरीमध्ये फेसबुक, इंस्टाग्राम, जीमेल आणि इतर खात्यांच्या लॉगिन तपशीलांची तडजोड झाली आहे. लीक झालेले क्रेडेन्शियल्स जवळजवळ प्रत्येक प्रमुख ऑनलाइन सेवेला व्यापतात, जे 'मोठ्या प्रमाणात शोषणासाठी ब्लूप्रिंट' तयार करतात, असे संशोध म्हणणे आहे. डेटाबेसमध्ये फेसबुक आणि इंस्टाग्राम सारख्या सोशल मीडिया दिग्गजांसाठी लॉगिन माहिती, जीमेलसह ईमेल सेवा, गिटहब सारखे डेव्हलपर प्लॅटफॉर्म, टेलिग्राम सारखे मेसेजिंग ॲप्स, व्हीपीएन सेवा आणि अगदी सरकारी पोर्टलसाठी लॉगिन माहिती आहे. प्रत्येक रेकॉर्ड सामान्यतः एका मानक स्वरूपाचे अनुसरण करतोः वेबसाइट RL, वापरकर्तानाव आणि पासवर्ड. ही रचना इन्फोस्टीलर मालवेअरद्वारे वापरल्या जाणाऱ्या संकलन पद्धतींशी जुळते, जे संक्रमित डिव्हाइसेसमधून संवेदनशील माहिती गोळा करण्यासाठी डिझाइन केलेले दुर्भावनापूर्ण सॉफ्टवेअर आहे. सर्व वापरकर्त्यांसाठी त्वरित कारवाई आवश्यक आहे. जगभरात सुमारे 5.5 अब्ज लोकांकडे इंटरनेटचा वापर असल्याने, या उल्लंघनामुळे प्रत्येक व्यक्तीच्या अनेक खात्यांवर परिणाम होण्याची शक्यता आहे. सुरक्षा तज्ञ सर्व ऑनलाइन खात्यांमध्ये त्वरित पासवर्ड बदलण्याची शिफारस करतात, शक्य असेल तेथे मल्टी-फॅक्टर ऑथेंटिकेशन सक्षम करतात आणि अद्वितीय, मजबूत पासवर्ड तयार ? करण्यासाठी पासवर्ड व्यवस्थापकांचा वापर करतात. वापरकर्त्यांना त्यांच्या खात्यांचे नियमितपणे निरीक्षण करण्याचा आणि त्यांच्या क्रेडेन्शियल्सशी तडजोड झाली आहे का हे तपासण्यासाठी 'हॅव्ह आय बीन प्वॉन्ड' सारख्या सेवांचा वापर करण्याचा सल्ला देण्यात येत आहे.



“ शंका काढण्यास देखील ज्ञान लागले... ”



# परिनिब्बुत डॉ. भदंत आनंद कौसल्यायन

*आंतरराष्ट्रीय ख्यातिचे बौद्ध विद्वान. साहित्य वाचस्पती. राष्ट्रभाषा प्रचार समिती हिंदी विश्वविद्यालयाचे प्रधानमंत्री डॉ. भदंत आनंद कौसल्यायन ज्यांचे बौद्ध जगतात, बौद्ध साहित्याच्या निर्मितीत मौलाचे योगदान राहिले आहे. त्यांच्या योगदानाला नाकारता येत नाही. 5 जानेवारी1905 साली त्यांचा जन्म. तेव्हाच्या पंजाब हल्ली हरियाणा राज्यातील अंबाला जिल्ह्यातील सोहाना नामक गाव ही त्यांची जन्मभूमी आहे. रामचरण वर्मा आणि माता फुलवतीदेवी वर्मा हे त्यांचे आई-वडील. भदंतजीचे मूळ नाव हरिनामदास. त्यांनी 1920 मॅट्रीकची परीक्षा हिंदू मोहमंडन हायस्कूल अंबाला छावणी येथून पास केली. तर बी.ए. त्यांनी 1924 ला कौमी विश्वविद्यालय लाहोर येथून पास झाले. शिक्षण घेत असताना देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात सक्रीय सहभाग घेतला. त्यात त्यांना काही काळ कारावास भोगावा लागला. 1924 मध्येच त्यांची भेट महापंडित राहुल सांस्कृत्यायन यांचेशी झाली. त्यांच्याकडून भगवे वस्त्र परिधान करून बाबा विश्वनाथ परिवाज्रक झाले.*



भदंत आनंद कौसल्यायन

कालावधीत त्यांनी 1924 ते1926 मध्ये अस्पृश्य निवारणासाठी कांगडा जिल्ह्यामध्ये सरांडा आणि डुमले जातीच्या उत्थानासाठी कार्य केले. 1926 ते 1927 ला वाल्मिकी आश्रम बटाला पंजाबमध्ये राहून कार्य केले.10 फेब्रुवारी 1928 ला प्रवज्रा राहुल सांस्कृत्यायन यांच्या प्रेरणेने ग्रहण करुण बौद्ध धम्माच्या वाटेवर आलेत. 5 जानेवारी 1929 ला लोनुपोकुले धम्मानंद महास्थवीर तृतीय परिवेणाधीपती विद्यालंकार केलानीया. श्रीलंका यांच्या हस्ते उपसम्पदा स्वीकारली. 1932 ला राहुल सांस्कृत्यायन यांच्या सोबत देवमित्त अनागारीक धर्मपाल यांच्या आज्ञेनुसार इंग्लंडला प्रचारासाठी गेलेत. 1933-34 ला जर्मनी, पिनांग, मलेशिया, बँकॉक, रंगून आदी देशामध्ये प्रचार प्रसार केला. 1935 ते 1948 पर्यन्त सारनाथ महाबोधि सोसायटी येथे राहुन बौद्ध साहित्य निर्मितीत योगदान दिले. 1942 ते 1952 दरम्यान प्रधानमंत्री हिंदी विश्वविद्यालय हिंद नगर वर्धा येथे हिंदी भाषेच्या विकासासाठी अहिंदी राज्यामध्ये प्रचार प्रसार करण्याकरिता परिश्रम करुन योगदान दिले. 1949 ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचेशी अलिपूर रोड दिल्ली निवासस्थानी प्रथम भेट झाली. 1950 ते 1970 पर्यंत वर्ल्ड फेलोशिप ऑफ बुद्धिस्टचे उपाध्यक्ष राहिलेत. 1952 ला वर्ल्ड फेलोशिप ऑफ बुद्धिस्टचे प्रतिनिधी म्हणून बर्माला उपस्थिती. त्यांनी 1952 ते 1957 दरम्यान दक्षिण पुर्व एशियातील बौद्ध राष्ट्रामध्ये भ्रमण केले. 6 डिसेंबर 1956 ला डॉ. बाबासाहेब आबेडकर यांचे निधन झाले. त्यावेळी चार्टर्ड विमानाने त्याच्या पार्थिवासोबत मुंबईला आले. 7 डिसेंबर 1956 ला दादरच्या स्मशानभूमीवर जिथे आज चैत्यभूमी आहे तिथे जमलेल्या लाखो अनुयायांना बौद्ध धम्माची दीक्षा दिली व अंतिम संस्कारविधी डॉ. भदंत आनंद कौसल्यायन याचे हस्ते संम्पन्न झाला. यावेळी भदंत जगदीश कश्यप आवर्जुन उपस्थित होते.1957 ते 1961 पर्यंत विद्यालंकार विश्वविद्यालय केलानीया श्रीलंका येथे हिंदी विभाग प्रमुख म्हणून जबाबदारी पार पाडली. 1961 ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित 'बुध्द अँण्ड हिज धम्मा' या इंग्रजी ग्रंथाचे हिंदीमध्ये सर्वप्रथम अनुवादन केले. 1966-67 ला धम्मप्रचाराकरीता दीक्षाभूमी नागपूर येथे आगमन. 13 मे 1968 ला अनुराधापूर श्रीलंका येथून आणालेल्या बोधीवृक्षाचे रोपण दीक्षाभूमी येथे केले. 10 ऑक्टोबर 1970 ला ऑल इंडिया भिक्खू संघाची स्थापना झाली. ते संस्थापकांपैकी एक होते. 1970 ते 1987 पर्यंत संघानुशासक ऑल इंडिया भीक्खूसंघ भारत. म्हणून जबाबदारी पार पाडली. 14 एप्रिल 1971 ला दीक्षाभूमी नागपूर येथे 40 शिक्षित तरुणांना श्रामणेर दीक्षा दिली. 30 ऑक्टोबर 1971 ला विद्यावाचस्पती डिलिट हि पदवी नव नालंदा विश्वविद्यालयमार्फत प्राप्त झाली. 14 एप्रिल 1977 ला बौद्ध प्रशिक्षण संस्थान या संस्थेची स्थापना करुन त्याचवर्षी निराश्रित बालकांकरिता राहुल बाल सदन स्थापन केले. 1978 ला नागपूर महानगर पालिकेच्यावतीने नागरी सत्कार करुन गौरविण्यात आले. 1968 ते 1982 पर्यंत दीक्षाभूमी येथे निवास. दीक्षाभूमी संदेश पाक्षिक संपादक राहिलेत. 14 एप्रिल 1982 ला बौद्ध प्रशिक्षण संस्थान बुध्दभूमी महाविहार शिलान्यास मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांचे हस्ते. 1982 ते 1985 पर्यंत धंतोली येथे मधुकर मेश्राम यांच्याकडे निवास. 1987 ला बुध्दभूमी महाविहाराला थायलंड येथील वादपाकनाम महाविहाराकडून 750 किलो वजनाची 10 फुट उभी मूर्ती प्राप्त झाली. 5 जानेवारी 1985 ला बुध्दभूमी महाविहार येथे चंद्रमणी सभागृह अनावरण पूज्य दलाई लामा यांच्याा हस्ते. वृद्धावस्ता व व्याधी ग्रस्त अवस्थेमुळे प्रकृती खालावली असतांनासुध्दा रिडल्स इन हिंदुईजम यावर एक पुस्तक लिहिले.

भदंतजींनी शेकडो पुस्तकाचे लिखाण व संपादन केले. अनेक पत्रिका पेपर यामध्ये वेळोवेळी लेख लिहिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या व्यक्तीमत्वावर 'यदी बाबा न होते' हे पुस्तक लिहूण स्वतःला डॉ. बाबासाहेब आंबेडकर याच्या समग्र आंदोलनाला समर्पित केले. 'मेरे मरने के बाद मेरे चैत्य पर यह लिख देना की, डॉ. बाबासाहब आंबेडकर का काम कहते कहते एक सिपाई शहीद हो गया.' 22 जून 1988 ला त्याच मेयो रुग्णालय येथे त्यांचे परिनिर्वाण झाले. ■ ■



भदन्त नाग दिपंकर थेरो
मो. 9423605550

# गरीबीची स्वीकृती; भयंकर.. महाभयंकर !



रणजित मेश्राम
मो. 9890020789

गरीबीची स्वीकृती (acceptance) वाढतेय. छुपाछुपी ती येतेय. अदृश्य लाटेसम. पण वेगाने येतेय. हे भयंकर .. महाभयंकर आहे. वेळीच दखल नसेल तर कोसळणे आहेच !

आकडे.. निर्देशांक खुणावतातच. भोवताल त्याहून दाहक आहे. सोबत अक्षरउदासिता येतेय. निरक्षर, अल्पसाक्षर, सिमित शिक्षण प्रमाण वाढलेय. अंधार असा गडद होतोय. लोकनिष्ठा संपल्यागत झालीय. 2025 चे हे जीवनचरित्र आहे. स्वातंत्र्याच्या 78 वर्षानंतरही !

विषण्ण व्हावे असे प्रसंग रोज सापडतात. हतबल.. हतबुद्ध होऊन जायचे. गठ्ठ्याने माणसे या खाईत दडपली जात आहेत. केवळ शरीराने वाढलेली. भयाने ग्रासलेली. अन्याय सहणारी. पोटप्रश्नातच गुंतलेली. तिथेच संपणारी. पिढी जन्माला यावी. सद्यशासनस्थांना अशी पिढी हवी. सारे चित्रविचित्र आहे. भयावह आहे. कसा हा विकास. झगमगाट विरुद्ध ठणठणाट. कोणती ही अर्थव्यवस्था ? कसे हे राज्य ?



विकासाला मानवी चेहरा असतो. इथे बिनचेहऱ्याचे चाललेय. भयात असणे. स्वप्न नसणे. अघोषित अपंगालयच ! तरीही मुले जन्माला घालावी. सततचा आग्रह असतो. जनसंख्या फुगत जाते. ती फुगते की सुजते ? हिंदू मते वाढली. ते तसे समाधान. गरीबी ढीगाने वाढली. त्याचे काय ? पूजास्थळे याचनाकेंद्रे झालीत. चिंता जड झाली की लोटांगण येतेय. असेच चाललेय.

शाळा ओस पडल्यात. मजबुरीने वा अनिच्छेने. आता शिक्षण सक्तीही नाही. तसे धोरणही नाही. निधीही नाही. सरकार अंगावर घेत नाही. जन्माला घालता. तुमचे तुम्ही पहा. 'कल्याणकारी राज्य' बंदीखान्यात सडतेय. असेच चाललेय. भयता जगण्याचे अंग झालेय. असंघटित क्षेत्र अजगरासारखे पसरले. त्यात कंत्राटगिरी ! माणसांचे बाजार (ठिय्ये) वाढले. रेजा, कुली, मिस्त्री ! रोजगार निश्चितीची निश्चिती नाही. कामाचे अस्थायित्व. किती तास काम ? मोजमाप नाही. ते बांधकाम क्षेत्र असो वा हंगामी कामे. महिन्याचे, वर्षाचे वा दोन-तीन वर्षाचे. अस्थायी झोपड्या असतात. मुलें शाळाविहिन वाढत असतात. पूढे तो मजूर पुरवठा होतो. हेच अकुशल मनुष्यबळ ! दुष्टचक्र असे फिरत राहते. शारीरिक श्रम जन्माला येत असते.

कुंभमेळ्याची 'व्हायरल गर्ल' मोनालिसा (भोसले) सांगते, शाळेत गेलीच नाही. आता पश्चात्ताप येतो. चर्चा मात्र देखण्या डोळ्यांचीच ! तिचा बाप म्हणतो. मीही शाळा पाहिली नाही. बापलेक दोघेही निरक्षर. तो झापुकझुपूकवाला सुरज चव्हाण ही निरक्षर असल्याचे सांगतो. कोणाला काही वाटत नाही. गरीबाचे लेकरू आहे. जिंकवा.. वाढवा असे बोलले जाते.

ऑटोचालकाची मुलगी तहसीलदार झाली. ठळक बातमी होते. जणू नवल आहे. आधी हे सामान्य होते. गरीबीच्या स्विकृतीचे छुपे पोषण असे असे आहे. ध्यानातही येत नाही.

अशातच, कोणत्या ना कोणत्या पूज्य स्थळाला वा पुतळ्याला निधी उपलब्ध होतांना दिसतो. जगणे मात्र अती अवघड झालेले असते. नुकतेच 6 मे च्या मंत्रीमंडळ बैठकीत 5 हजार 573 कोटी खर्चाला मंजुरी देण्यात आली. यात, चोंडी येथील अहिल्यादेवी स्मृतिस्थळ 681.32 कोटी , अष्टविनायक गणपती मंदिर 147.81 कोटी, तुळजाभवानी देवी मंदिर 1,865 कोटी, ज्योतिबा मंदिर 259.59 कोटी, त्र्यंबकेश्वर मंदिर 275 कोटी, कोल्हापूर महालक्ष्मी मंदिर 1,445 कोटी व श्री क्षेत्र माहुरगड 829 कोटी यांचा समावेश आहे. असे असतांना उपराजधानी नागपुरचे पहा. मागील 10 वर्षात मनपाच्या 60 शाळा बंद झाल्या. शाळा भुखंडांचे मॉल झाले. स्मारक झाले. सार्वजनिक उपक्रम झाले. इ लायब्ररी झाल्या. मनपा कार्यालये झाली. काहींच्या इमारती भाड्याने दिल्या. काही बेवारस पडून आहेत. माहितीच्या अधिकारात ही माहिती उघडकीस आली. काय ही अनास्था ? मुले खाजगी शाळांत जात असतील काय ? ते झेपेल काय ? मनपा पसंत नाही की शिकतच नाहीत ? शिक्षक, शिक्षकेतर, सारेच घटले. घोळ नक्की आहे.

परत एक धक्कादायक वाचनात आले. गोंदियाचे आहे. चार इयत्ता अन् चारच विद्यार्थी ! कऱ्हारटोला येथील प्रसिद्ध जिल्हा परिषद शाळेत चारच विद्यार्थी शिकतात. पहिली ते चौथी वर्ग असतांना ! यंदा केवळ एकाच विद्यार्थ्याने प्रवेश घेतला.

अशीच अवस्था या जिल्ह्यातील 1,038 जिल्हा परिषद शाळांपैकी अनेक शाळांची असल्याचे छापून आहे.

काय समजावे ? भीषण विषमता. धोरणांची अस्पष्टता. बेरजी राजकारणाची मत्ता. विकत घ्यायची वाढलेली क्रयता. अन् हताश? निराश जनता ! असा हा चकवा आहे. सामान्य माणसाचा 'से' राहीला नाही. तो दाखवावा लागेल. आधी यांना, अशांना सत्ताच्युत करणे हा प्रारंभिक उपाय होऊ शकतो. कदाचित अंतिमही ! ■ ■

# नातेसंबंध



एका वडिलांनी आपल्या मुलाचे अत्यंत चांगल्याप्रकारे संगोपन केले. त्याला उत्तम शिक्षण दिले, साऱ्या इच्छा पूर्ण केल्या. काळानंतर तो मुलगा यशस्वी माणूस झाला. एका मल्टीनॅशनल कंपनीत सीनियर इंजिनीयर पदावर काम करू लागला. उच्च पद, भरघोस पगार, सर्व सुखसोयी कंपनीकडून मिळाल्या.

काळ पुढे सरकत गेला. त्याचे लग्न एका सुसंस्कारित मुलीशी झाले. मुलेही झाली. आता त्याचे स्वतःचे कुटुंब झाले होते. दरम्यान वडील आता वयस्क झाले होते. एक दिवस त्यांना मुलाशी भेटायचे मनापासून वाटले. ते मुलाच्या ऑफिसमध्ये गेले. तिथे त्यांनी पाहिले की त्यांचा मुलगा एका भव्य ऑफिसचा अधिकारी झाला आहे, त्याच्या हाताखाली शेकडो कर्मचारी काम करत होते!

हे सगळे पाहून वडिलांचे हृदय आनंदाने भरून आले, अभिमानाने छाती फुलून आली. ते थेट मुलाच्या केबिनमध्ये गेले, त्याच्या खांद्यावर हात ठेवून प्रेमाने विचारले. 'अरे, जगातला सगळ्यात शक्तिशाली माणूस कोण?' मुलगा हसून म्हणाला, 'पप्पा, माझ्याशिवाय अजून कोण असणार!' वडिलांना हे उत्तर अजिबात अपेक्षित नव्हते. त्यांना खात्री होती की मुलगा अभिमानाने म्हणेल, 'पप्पा, जगातला सर्वात शक्तिशाली माणूस तुम्हीच आहात. कारण आज मी जो काही आहे, तो तुमच्यामुळेच!' त्यांच्या डोळ्यांत टचकन अश्रू आले. ते हळूच चेंबरच्या दाराकडे वळले. जाता-जाता पुन्हा एकदा मागे वळून विचारले. 'अरे, पुन्हा सांग, जगातला सगळ्यात शक्तिशाली माणूस कोण?'

मुलगा म्हणाला, 'पप्पा, तुम्हीच आहात. जगातले सगळ्यात शक्तिशाली माणूस!'

वडील थोडे आश्चर्यचकित झाले. म्हणाले, 'अरे, आत्ताच तर म्हणाला होतास की तू स्वतः आहेस?' मुलगा हसत हसत त्यांना खुर्चीत बसवत म्हणाला, 'पप्पा, तेव्हा तुमचा हात माझ्या खांद्यावर होता. ज्याच्या खांद्यावर वडिलांचा हात असतो, तो मुलगा तर जगातलाच नाही, तर साऱ्या ब्रम्हांडातला सगळ्यात शक्तिशाली माणूस असतो!' हे ऐकून वडिलांच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले. त्यांनी आपल्या मुलाला घट्ट मिठी मारली. खरंच ज्याच्या डोक्यावर वडीलांचा हात असतो, तो माणूस आयुष्यात कधीच हरत नाही. म्हणूनच नेहमी आपल्या आई-वडिलांचा सन्मान करा! आपल्या यशामागे त्यांचाच हात असतो. संपूर्ण जग जरी तुमच्यावर जळाले, तरी फक्त आई-बाबाच असतात, जे मनापासून तुमच्या यशात आनंद मानतात. ■ ■

-ज्योती निंबाळकर

# अंतर्मनातील चैतन्याचा झरा

एक हळुवार मनाची, दुसऱ्यांच्या भावनांना सुकुमारपणे जपणारी, संवेदनशील कवयित्री आपणासमोर कवितासंग्रह घेऊन येते आहे. नाव आहे 'चैतन्य झरा'. आपण आपल्या जगात जगता जगता दुसऱ्यांचा विचार करून त्यांना आनंद देणे ही किती सुंदर गोष्ट आहे ना! दुसऱ्यांच्या ओंजळीत फुले टाकताना स्वतःचे हातही सुगंधीत होतात आणि चार दोन पाकळ्या आणि रंग आपल्या हाताला चिटकून येतातच की! प्रणोती कळमकर ही आमची मैत्रीण अशीच आहे. तिने आपल्या आयुष्यात हेरले की आनंद जर मिळवायचा असेल तर आनंद वाटायला शिकले पाहिजे. मग त्यासाठी ती दुसऱ्याच्या परडीत कधी शब्द फुले टाकते तर कधी काव्य फुले!





प्रणोतीचा अविशा प्रकाशनने प्रकाशित केलेला 'चैतन्य झरा' वाचला आणि मनात चैतन्याची कारंजी थुई थुई नाचायला लागली. तिचा पहिला संग्रह होता 'स्वप्नपूर्ती'. हे दोन्ही काव्यसंग्रह आजीच्या उबदार गोधडीची आठवण करून देणारे! कधी कधी शब्दही आपल्याला अलगद हात धरून आयुष्याच्या वाटेवरून चालायला लावतात. 'चैतन्य झरा' हा असाच एक सहप्रवासी आहे. नात्यांच्या नाजूक धाग्यांना, मनातल्या हळव्या भावनांना आणि समाजातल्या हलक्याशा जाणिवांना या संग्रहाने खूप प्रेमाने हाताळले आहे. या कवितांमधील शब्द फाजील नाहीत, कर्णकर्कश सूर त्यात नाहीत. शब्दबंबाळ ढोल नाहीत तर फक्त सहज ओघाने वाहणारी मनाची कहाणी आहे. कविता वाचताना आपण कुठेतरी स्वतःलाही भेटतो, आपल्याला हरवलेली माणुसकी सापडते आणि विसरलेली आशा नव्याने जागी होते.

तिला आपल्या अभिजात मराठीचा सार्थ अभिमान आहे. चाल मराठी - बोल मराठी, जन्म मराठी - जगणे मराठी, माय मराठी - बोल मराठी, सार्थ अभिमान - मी मराठी..

कवितेच्या आकंठ प्रेमात असलेली ही कवयित्री म्हणते कविता माझी सखी आहे. तिने मला जीवनात खूप काही दिले आहे. तिने मला ओळख दिली, जीवन जगण्याची कलाही दिली अशी तिची कृतज्ञता आहे.

'नको मज धनसंपत्ती
नको मज मौल्यवान भेट
कविताच माझा आनंद
जगणार कवितेसाठी थेट...'

अशी तिची कृतज्ञता आहे. आयुष्यात सुंदर रंगीबेरंगी फुले येतात तसेच काटेही बोचतातच की! चांगल्या गोष्टी आठवून काटेरी डंख दूर करण्याचे कसब तिच्या ठायी आहे.

'स्मृतिगंध गुलाब पुष्पांचा
दरवळे नित्य सुहृदांकडून
तर तीक्ष्ण काटे टोचण्याचा
हिशेब कशाला ठेवायचा?'

या तिच्या ओळी तर नैराश्यावर सकारात्मकतेने कशी मात करावी हे शिकवणारी सायकॉलॉजी आहे. संत तुकारामांनी सांगितलेच आहे मनाचे महत्त्व! 'मन करा रे प्रसन्न सर्व सिद्धीचे कारण'असे जेव्हा संत तुकाराम महाराज म्हणतात, तेव्हा आयुष्यातल्या काटे टोचणाऱ्या गोष्टी बाजूला ठेवा असेही सांगतातच की! कुंभमेळ्याचे फॅड यावर्षी फारच माजले होते. चेंगराचेंगरीत किती बळी गेले असतील! तो दांभिकपणा हवा तरी कशाला? ही तर अंधश्रद्धा आहे. कर्म हीच पूजा असावी. माणुसकीवर श्रद्धा हवी हे सांगणारी 'गंगास्नान' ही कविता सुशिक्षितांना पण बरेच काही शिकवून जाते. बुद्धीचा वापर न करता सगळे करतात म्हणून आपण करणे हे किती निर्बुद्धपणाचे लक्षण आहे हे सुशिक्षित केव्हा लक्षात घेणार? मला तर मनापासून वाटते की तिने समाजात फोफावणाऱ्या अंधश्रद्धावर जास्तीत जास्त कविता लिहाव्यात.. समाजजागृतीचे मोठे कार्य तिच्या लिखाणातून झाल्याशिवाय राहणार नाही. अनेक प्रबोधनकारांवर आणि महापुरुषांवर प्रणोतीला कविता लिहिण्यासाठी आपली लेखणी खर्ची घालावीशी वाटणे स्वाभाविकच आहे. राजमाता जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी राजे, वैराग्यमूर्ती संत गाडगेबाबा, महात्मा जोतिबा फुले, महात्मा गांधी, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मदर तेरेसा, उद्योगरत्न रतन टाटा यासारख्या महामानवांना ती तिच्या काव्यातून त्यांच्या वंदन करते.

खरे सांगा अध्यात्मिक सुखासाठी
का स्वप्न बघावे कबीरेश्वरधामाचे
आई-वडिलांची सेवा करूनी
मिळतील पुण्य चारीधामाचे...

इतकी सोपी सरळ तिच्या सुखाची व्याख्या आहे.

नुकताच एक थरार आपण अनुभवला. कश्मिरातील पहेलगाम शहरातील या थराराने सगळ्यांच्या मनात थरकाप भरवला. त्याही प्रसंगाची संवेदना या संग्रहात आपल्याला दिसेल. तसेच यात काही बालकविता आहेत तर काही पर्यावरणावर प्रकाश टाकणाऱ्या.

तिची गोड मुलगी डॉ. ऋतुजावर तिचा भारी जीव. तिची कन्या म्हणजे तिच्यासाठी पृथ्वीवरचा स्वर्गच. किती सुंदर कल्पना आहे ही! तिचे संपूर्ण कुटुंब तिने फार सुरेख सजवलेय. समंजस पती डॉ. हरिश, कर्तृत्ववान मुलगा डॉ. स्वप्नील, सून डॉ. मिताली, जावई डॉ. गोमासे आणि तिची चार गोड नातवंडे यांच्यामुळे झालेले तिच्या घराचे गोकूळ तिला नेहमीच सुखावत असते. 'घरात हसरे तारे असता मी पाहू कशाला नभाकडे?' असेच तिचे विश्व आहे. या साऱ्यांप्रती तिच्या मनातील कृतज्ञ भाव वेळोवेळी इथे प्रकट होतो. अनेक सामाजिक जाणीवांच्या कवितेतून तिने आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांना, मोबाईलच्या व्यसनात आधीन झालेल्या तरुणांना मार्मिक मार्गदर्शन केले आहे. एकूण 75 कवितांच्या हा काव्यसंग्रह सुप्रसिद्ध पंचभाषिक आणि महाराष्ट्रातील पहिल्या महिला गझलकार मा. आशाताई पांडे यांच्या अतिशय सुंदर शैलीतील आशीर्वादाने आणि आम्ही ज्यांना ब्लर्ब मास्टर म्हणतो त्या प्रदत तांडेकर सरांच्या सुरेख ब्लर्बने सजला आहे.

'चैतन्य झरा' या संग्रहात प्रत्येक कविता म्हणजे एका जिवंत क्षणाचा, एका नाजूक भावना-थेंबाचा स्पर्श आहे. नात्यांचे कधी उमलणारे, कधी झुरणारे रंग, समाजाच्या कोपऱ्यातून ऐकू येणाऱ्या हाकांचा मृदू सूर आणि जीवनाच्या प्रवाहातली नाजूक हालचाल... या साऱ्या गोष्टी येथे अलगद गुंफलेल्या आहेत. या कविता वाचताना कधी मन हलके होते, तर कधी विचारांची चिवट गाठ सैल होते. कवयित्रीने शब्दांना नुसती रचना दिली नाही, तर त्यात आपले हृदयही मिसळले आहे. सोप्या भाषेतून आलेली ही गोडसर संवेदना वाचकाला नक्कीच आपलीशी वाटेल.

'चैतन्य झरा' हा केवळ कविता संग्रह नाही, तर तो आपल्या आतल्या 'चैतन्याचा' शोध आहे. या प्रवासाला आणि प्रणोतीच्या पुढील वाटचालीसाठी मनापासून शुभेच्छा!

'असेच तिने लिहीत राहावे
प्रेमाचे अत्तर शिंपीत जावे...' ■ ■



डॉ. लीना निकम
9881669345

# अजून आम्हाला खूब पल्ला गाठायचा आहे !

**काही विषय व्यक्तिगत वाटत असले तरी ते व्यक्तिगत नसतात. ब्राम्हणशाही आपल्याला कसे संमोहित करते त्याची चर्चा होणे आज गरजेचे आहे. मृत्यू संस्कार ही बाब व्यक्तिगत नाही ती सार्वजनिक आहे. तो विषय सामाजिक परिवर्तनासोबत जुळलेला आहे. समाजाचे मानसिक गुलामगिरी सोबत जुळलेला आहे. अंत्ययात्रा निघतांना लोक काय काय करतात हे सर्व लोक जाणतात. चुकीचे दिसत असले तरी त्या बद्दल समाज बोलत नाही. तो त्यांचा व्यक्तिगत विषय आहे. आपण बोलू शकत नाही. बोललो तर त्यांच्या भावना दुखतात असे म्हणून आपण मोकळे होतो. आपण हे विसरतो की, यातूनच पुढे रूढी परंपरा निर्माण होतात. या परंपरा म्हणजे ब्राम्हणशाही. इथे ब्राम्हण कुठेच दिसत नाहीत. पण त्यांनी संमोहित केलेले महार ब्राम्हणांची उणीव भरून काढतात.**



बुद्ध आत्मा, देहाचा पुनर्जन्म, दैव, ईश्वर आणि सर्व नित्य आहे हे मानत नाहीत. अनात्म, अनिश्वर आणि अनित्य या तत्त्वावर विशुद्धी मार्ग उभा केला. ब्राम्हण आत्मा, ईश्वर, नीत्य हे तत्त्व मानतात. म्हणून ईश्वर प्रसन्न झाला पाहिजे यासाठी कर्मकांड करतात. या कर्मकांडाचा परिणाम सर्वच ब्राम्हणेतर लोकांवर झाला. कारण बहुसंख्यांक लोक नेहमी अल्पसंख्य लोकांना दबावात आणून त्यांच्या मार्गाने घासत नेतात. स्वतःला बौद्ध म्हणविणारे महार अंत्यसंस्कार करताना अंत्ययात्रेत मृत व्यक्तीला जेजे आवडते ते नेतात. तंबाखू, गुटखा, बिडी, दारू, मटण या शिवाय अजून काय काय नेतात तेच जाणोत. त्याचा आत्मा शांत होतो असे ते म्हणतात. हीच मानसिक गुलामगिरी आहे. जगातील मानसिक गुलाम आपल्या स्वातंत्र्याची उद्घोषणा करू शकत नाही. भारतात भाजप आणि संघ या मानसिक गुलामांचे गुलामीवर पोसल्या जात आहे. आज देशाचे जे पतन होत आहे ते या मानसिक गुलामीमुळे. दबावतंत्र हे या संमोहनात कार्य करते. त्याला समाज बळी पडतो. त्यातून वाईट चालीरिती निर्माण होतात. अस्पृश्यता, सती प्रथा, धर्मांधता या अश्याच रूढ झाल्यात. अनेक ठिकाणी दबाव टाकणारे आणि सहन करणारे हे अडाणी नाहीत. ते उच्च शिक्षित आहेत. ते केवळ गरीब नाहीत. ते लखोपती पण आहेत. त्यामुळे परिवर्तनवादी हताश होऊन या घटना पाहत बसतात. मृत्यू हा दुःखदच म्हणावा लागेल. अशावेळी मुलगी, आई, पत्नी, आजी हा महिला वर्ग जास्त भावनाविवश होतो. त्या विवषतेत त्यांचा विवेक राहत नाही. म्हणून इतरांनी आपला विवेक सोडून द्यावा असेही नाही. उलट इतरांनी विवेकी राहून होणाऱ्या चुका टाळाव्यात. कारण त्या केवळ चुका नसतात तर त्या मानसिक गुलामगिरी घट्ट करणाऱ्या असतात. त्याचा वाईट परिणाम समाजावर होत असतो. कारण समाज त्याचे अनुकरण करत असतो. म्हणून ते थांबवणे गरजेचे असते. अश्याच एका अंत्ययात्रेत घडलेली घटना बरेच प्रश्न निर्माण करतात.

मृत व्यक्ती रोज घालायच्या ज्या स्लीपर असतात त्यावर त्यांचे फारच प्रेम होते. म्हणून ती त्यांचे अंत्ययात्रेत मृत व्यक्तीला ठेवलेल्या सीडीवर ठेवायचा आग्रह झाला. मृताच्या पत्नीने ऐकून घेतले. बाकीच्यांनी मात्र तो मुद्दा उचलून धरला. काढून ठेवलेली ती चप्पल पुन्हा मयताचे सोबत ठेवली. स्मशानभूमीत परत चप्पल मुद्दा समोर आला. सरण रचणारा स्मशान भूमीत जो व्यक्ती होता त्यांनी सांगितले की, 'सर्व सामान बाहेर काढा.' चप्पल प्रश्न पुन्हा आला. ती चप्पल काढली. पुन्हा त्यांचे नातेवाईकांनी चप्पल मुद्दा उचलून धरला. एक दोन सुशिक्षितानी पुन्हा चप्पल आणली आणि सरणावर ठेवली. आम्ही पाहात राहिलो. मृतासोबत चप्पल जळून राख झाली. दुसऱ्या दिवशी ती राख मग कन्हान नदीत शिरवली गेली. मृत व्यक्तीसोबत त्यांची प्रिय चप्पल देखील ते जिथे गेले असतील त्यांचेसोबत गेली. अशी या मानसिक गुलामांची समज. बौद्ध उपासक आणि धम्म प्रचारक म्हणून मनात या प्रसंगी काही प्रश्न निर्माण झालेत.

**प्रश्न पहिला :-** मृत व्यक्तीस काय काय प्रिय होते?

सर्वात प्रिय पत्नी. नंतर लेकरे. त्यांची भावंडे. नंतर त्यांचे नातेवाईक. नंतर मित्र मंडळी. जसे दारू पिणाऱ्याला दारू प्रिय असते, मटण, बिडी, सिगरेट, गांज्या जे जे ज्याला आवडेल ते ते त्या त्या व्यक्तीचे सोबत द्यावे लागेल. लोक देतात. जे लोक असे करतात, अशावेळी बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना नाकारावे लागेल. या दोन्ही बाबी सोब सोबत राहू शकत नाहीत. एक काहीही करा. हे करा नाही तर ते करा. या पूर्वीच्या काळात हीच रूढी प्रियतेची भूल देऊन नवऱ्याच्या चितेवर त्याचे पत्नीला जाळावे लागले. ती सती प्रथा. कित्येक वर्ष मोठ्या श्रद्धेने सती जाणारी स्त्री नटून सजून चितेवर झोपली आणि सती म्हणून जाळली गेली. तिचे अंगावरील दागिणे ब्राम्हणांनी घेतले. ज्याचा फायदा होतो तो त्याची वकिली करतो. सती प्रथा ब्राम्हणांनी रूढ केली. कारण त्यांना सतीचे सर्व दागिणे मिळत असे. जबरदस्तीने समाजातील बायका अश्याच जाळल्या गेल्यात. त्यांची मंदिरे बांधली गेली. त्या सती प्रथेचे उदात्तीकरण करण्यात आले. इंग्रज आले तेव्हा कुठे बायकांची जाळपोळ करणारी क्रूर सती प्रथा थांबली. नाही तर ती तशीच कायम असती. अशा नकळत एका क्रियेतून दुसरी क्रिया घडते. तो मुद्दा चप्पल पुरता मर्यादित राहू शकत नाही.

**दुसरा प्रश्न :-** त्यांचे अंगावर जे सोने - चांदी आणि जवळ रुपये असतील ते देखील प्रिय असेल. त्याला मात्र जाळायचे नाही. कारण त्याला किंमती आहेत. चप्पल बिचारी शंभर दोनशे रुपयाची. ती जाळली तरी चालते. हा आमचा लोभ. इथे मात्र तडजोड सहज होते. एकदा संत कबीरजीला त्यांचे गुरूनी आपले वडिलांचे श्राद्ध करायचे दिवशी खीर बनवायला गाईचे दूध आणायला सांगितले.

संत कबीर विचारतात, 'गुरुदेव तुमचे वडील केव्हा मेले?'

गुरू म्हणाले, 'मागचे वर्षी.'

'मग त्यांचे काय केले?', गुरू म्हणाले त्यांना जाळले.

मग ते कसे खीर खातील?, गुरू चिडले आणि म्हणाले,

'मुजोरी न करता गुरूची आज्ञा पालन करून दूध आण.'

कबीर जातात आणि मेलेली गाय आणि गवताची पेंडी आणतात.

गुरू विचारतो, 'अरे मुर्खा ही गाय तर मेलेली आहे.'

कबीर म्हणतात, 'काळजी करू नका गुरुदेव. मी गायी करीता गवत देखील आणले. चारा खाऊ घाला आणि गाईचे दूध काढा.'

गुरू म्हणतात, 'अरे मेलेली गाय गवत कसे खाईल?'

कबीर म्हणाले, 'जसे तुमचे मेलेले वडील खीर खातील, तशी ही मेलेली गाय गवत खाईल. जर मेलेली गाय गवत खाऊ शकत नसेल तर मेलेले तुमचे वडील देखील खीर खाऊ शकणार नाहीत.' हा तर्क 500 वर्षापूर्वी कबीर लाऊ शकतात, तर आजचे विज्ञान युगात उच्च शिक्षित बौद्ध लोक जे शिक्षक, इंजिनियर, अधिकारी असलेले आणि डॉ. बाबासाहेबांना मानणारे लोक का लाऊ शकत नाहीत? कबीर यांच्याप्रमाणे विद्यापीठातील डिग्रीधारक नव्हते तरी ते तर्क करतात. पण हे डिग्रीधारक तर्क का समजू शकत नाही की मृत व्यक्ती चप्पल घालून कुठे फिरेल?, त्यांच्या सर्व प्रिय वस्तू त्यांचे सोबत का देत नाहीत? हे सर्व तर्क आपण केले पाहिजे. प्रचारक म्हणून ही अपेक्षा ठेवणे रास्त आहे असे वाटते. जर आपण बुद्ध, फुले आणि डॉ. बाबासाहेबांना मानत असाल तर त्यांना जाणले देखील पाहिजे. हे उच्चशिक्षित लोकांची जबाबदारी आहे. कारण तुम्ही जो श्वास घेता आणि घास खाता तो डॉ. बाबासाहेबांचे चळवळीमुळे. आपण दोन दगडावर पाय ठेऊन चालत असाल तर ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सोबत बेइमानी आहे. तुम्ही परत नरकात जात आहात याचे दुःख आहे. तुमच्या या कृतीमुळे चळवळ मागे जाते हे दुःख त्यापेक्षा जास्त मोठे आहे. नरकातून मुक्त व्हा!

डॉ. बाबासाहेब हिंदू धर्म सोडताना म्हणाले होते, 'माझी आज नरकातून मुक्ती झाली.' जे रूढी प्रिय लोक आहेत त्यांनी मनातून हिंदू धर्म सोडला नाही आणि बौद्ध धर्म स्वीकारला नाही. याचा अर्थ त्यांची नरकातून मुक्ती झाली नाही.' यामध्ये दोष कुणाचा? प्रचारकांचा देखील दोष आहे. आपण या रूढी प्रिय लोकांचा विश्वास संपादन करू शकलो नाही. त्यांचे पर्यंत धम्म नेता आला नाही. आपण कमी पडलो. कारण समाजाचे नेतृत्व राजकीय नेते करतात. समाजावर राजकीय चळवळ प्रभाव टाकते. आपली चळवळ मागे आल्यामुळे काँग्रेस, सेना, भाजपमध्ये जे लोक घुसले ते हिंदू धर्मात परत जाऊ लागलेत. त्यामुळे सामान्य रूढी प्रिय लोकांना बळ मिळते. जो पर्यंत धार्मिक आणि सांस्कृतिक चळवळ समाजावर प्रभुत्व स्थापित करू शकत नाही तो पर्यंत हे वैचारिक प्रदूषण होत राहील आणि आपल्याला त्याची किंमत मोजावी लागेल. जेजे लोक सेना, भाजप, काँग्रेसमध्ये आहेत तेते लोक हिंदू म्हणून जगतात. तेच परिवर्तनाला विरोध करतात. म्हणून माझ्या सहित आपण सर्व देखील याला जबाबदार आहोत.

आपण काय केले पाहिजे ? आपण मैत्री वाढवली पाहिजे. आपले आचरणाचा प्रभाव निर्माण केला पाहिजे. आपला निःस्वार्थी, सदाचारी, देशभक्त, सर्व जाती धर्माला जोडणारा धर्मनिरपेक्ष राजकीय पक्ष निर्माण केला पाहिजे. जातवादी धर्मकारण, समाजकारण आणि राजकारण आपण त्यागले पाहिजे. तिरस्कार करणारा स्वभाव बदलला पाहिजे. हे जर झाले तर आपला धर्मप्रचार जातीच्या भिंती तोडून सार्वजनिक होईल आणि ज्यांचे मनात (महार हिंदूंचे) न्यूनगंड निर्माण झाला तो नष्ट होईल.

रडून काय होणार? हे माझे रडगाणे नाही. हा केवळ माझा व्यक्तिगत मुद्दा देखील नाही. ही समस्या समाजाची आहे. म्हणून सकारात्मक भावनेने माझ्या मताला सर्वांचा दुजोरा मिळाला पाहिजे. तरच हे वैचारिक प्रदूषण थांबेल. त्यासाठी आपल्याला अजून फार मोठा पल्ला गाठायचा आहे. ■ ■

लेखांक ११६



अशोक सरस्वती बोधी
मो. 8530980741

# चितमपल्लीची पुस्तके म्हणजे वाचकांसोबतचा संवाद

## प्राणी, पक्ष्यांच्या आवाजाने मारुती चितमपल्लींना आदरांजली.

*18 जून 2025 ला मारोती चितमपल्ली यांचे निधन झाले. त्यांना अखेरचा निरोप देण्याकरिता दक्षिण सोलापूर तालुक्यातील चुंगी येथील हलगी पथकाने आपल्या पारंपारिक पद्धतीने हलगीचा कडकडाट करून व हाताच्या कोपराने आणि डोक्यावर नारळ फोडून चितमपल्ली यांना अखेरचा निरोप दिला. प्रेतयात्रेत सहभागी वाचकांनी त्यांच्या पुस्तकाचे मुखपृष्ठ हातात घेऊन उजाळा दिला तर अंबादास कणकट्टी यांनी प्राणी व पक्षांचा आवाज काढून त्यांना आदरांजली वाहिली.*

वाघ, पक्षी, झाडे-झुडपे आणि आदिवासींच्या जगण्याशी त्यांनी जुळवलेला भावनिक बंध कुणीही विसरू शकणार नाही. त्यांच्या लेखणीतून निसर्ग बोलायचा आणि त्या प्रत्येक पानातून वाचकांच्या मनात हिरवळ रुजायची. त्यांची पुस्तके म्हणजे वाचकांसोबतचा संवाद होय.

पद्मश्री मारोती चितमपल्ली यांच्या 'रानवाटा', 'चिटकुल्या', 'प्राणीसंवाद', 'निसर्गवेध' अशा त्यांच्या पुस्तकांनी हजारो वाचकांच्या मनात निसर्गाचे अनोखे विश्व उभे केले. फक्त निरीक्षण नव्हे, तर त्यांनी निसर्गाशी संवाद साधला. तो संवाद इतका जिवंत होता, की वाचक त्याच्याशी एकरूप व्हायचे. या पार्श्वभूमीवर माझी पण एक आठवण आहे. नागपूर साहित्य प्रसार केंद्रने चितमपल्ली यांचा रंगीत मोठा ग्रंथ प्रकाशित केला होता. साहित्य प्रसार केंद्र नागपूर येथे माझे जाणे येणे आणि पुस्तके खरेदी करणे असल्यामुळे याच केंद्रातून जिल्हा परिषद नागाझरी शालेय वाचनालयसाठी पुस्तके खरेदी होत होती. त्यात मी चितमपल्ली यांचे पुस्तके सर्व खरेदी केली होती. त्यांच्या पुस्तकातून जंगल मे मंगल करता येते हे चितमपल्ली यांनी शिकविले आहे. त्याच प्रेरणेने बोर अभयारण्यतील जंगल व्याप्त येणीदोडका शाळा यावर लेखन केले. त्याला फार प्रसिद्धी मिळाली होती. खरे तर त्यांचे जीवन म्हणजेच निसर्गसंवर्धनाचे मूर्त स्वरूप. पेंच, ताडोबा, नवेगावसारख्या अभयारण्यात काम करताना त्यांनी जंगलाचे आणि तिथल्या जीवांचे संरक्षण केले, त्याचबरोबर तेथील ताज्या गोष्टी पुस्तक रुपात आपल्या पर्यंत आल्या आहेत.

त्यांच्या कार्यासाठी त्यांना 'अरण्यऋषी' ही उपाधी मिळाली होती. तर जानेवारी 2025 मध्ये त्यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. मारुती चितमपल्ली हे केवळ सेवानिवृत्त वन अधिकारी नव्हते-त्यांचे संपूर्ण आयुष्यच निसर्गाच्या सेवेसाठी समर्पित होते. निसर्गाची भाषा जगणारे अभ्यासक वयाच्या 93व्या वर्षी अखेर निसर्गातच विलीन झाले. निसर्गाचे खरेखुरे व्याख्याते, पक्षिशास्त्राचे जाणते मार्गदर्शक आणि अरण्याच्या संगतीत आयुष्य वेचणारे पद्मश्री मारुती चितमपल्ली यांचे सोलापूर येथे दुःखद निधन झाले. त्यांच्या लेखणीने लाखो वाचकांच्या मनात निसर्गाविषयी प्रेम जागवले. 'पक्षी जाय दिगंतरा', 'रानवाटा', 'जंगलाचं देणं', 'वनवासी' यांसारख्या साहित्यकृतींमधून त्यांनी जंगल, प्राणी, पक्षी आणि निसर्गाशी आपले नाते नव्याने उलगडून दाखवले.

36 वर्षांची वनसेवा आणि त्यानंतरचा प्रबोधनात्मक लेखनप्रवास हे त्यांच्या जीवनाचे सार होते. वन्यजीवांचे संरक्षण, मराठी भाषा समृद्ध करणे आणि पर्यावरणाशी नाते घट्ट करताना त्यांनी स्वतःचे संपूर्ण आयुष्य अर्पण केले. सोलापूर येथे एका गिरणी कामगाराच्या कुटुंबात त्यांचा जन्म झाला. मारुती भुजंगराव चितमपल्ली हे त्यांचे पूर्ण नाव. चितमपल्ली यांच्या वडिलांना वाचनाचा छंद होता. शिक्षणाचे महत्त्व ते जाणून होते. आपल्या मुलांनी विणकामाचे साचे चालवू नयेत, त्यांनी शिकावे ही त्यांची इच्छा होती. चितमपल्ली यांची आई सुगंधाबाई, म्हणजे अम्मा. स्वभावाने शांत आणि सहनशील होती. तिच्या पावलांना रानवाटांची माहेर ओढ होती. इसापाप्रमाणे तिच्या गाठीला कधी न संपणारा कहाण्यांचा खजिना होता. हा वारसा घरातून चितमपल्ली यांना लाभला. त्यांच्या पूर्वजांकडून झाडे लावणे, झाडांवर प्रेम करणे या गोष्टी त्यांना मिळाल्या. अम्मा, माळकरी आत्या, लिंबामामा हे त्यांचे अरण्यविद्येतले गुरू होते. निसर्ग चैतन्यमय आहे, सारे अरण्य म्हणजे एक प्राणमय जीव आहे, त्याला त्याचे स्वतंत्र व्यक्तित्व आहे ही निसर्गाकडे पाहण्याची स्वतंत्र आणि व्यापक दृष्टी चितमपल्ली यांच्या निसर्गलेखनाला निराळेपण मिळवून देते. चितमपल्ली यांच्या ललित साहित्याचा एक लक्षणीय विशेष असा की, अरण्यविद्येतून प्राप्त झालेली शास्त्रीय माहिती अतिशय लालित्यपूर्ण आणि रोचक स्वरूपात त्यात येते. शास्त्रीय ज्ञान आणि लालित्य यांचा सुरेख मेळ त्यांच्या साहित्यात पाहायला मिळतो. नाना रसभावनांनी त्यांचे लेखन अंतर्बाह्य फुललेले आहे. शास्त्रीय ज्ञानाच्या भाराने ते वाकले नाही. शास्त्रीय ज्ञान ललित रूप धारण करून अवतरण्याचे अप्रूप त्यांच्या ललितगद्यात पहायला मिळते. सृष्टीच्या माहीतगाराने अत्यंत रसज्ञ वृत्तीने केलेले हे लेखन आहे. त्यातून वनविद्येचे, अरण्यानुभवाचे अस्पर्श, अनोखे असे हिरवे जग मराठी साहित्यात आले. त्यांच्या ललित लेखनाने मराठी साहित्याच्या अनुभवाच्या कक्षा रुंदावल्या. सूक्ष्म निरीक्षण, गाढा व्यासंग, संशोधकाची दृष्टी, सृष्टिविषयक जागते कुतूहल या गुणांमुळे त्यांनी केलेले वन्यजीवांचे, कीटकसृष्टीचे आणि एकूणच निसर्गजीवनाचे चित्रण लक्षणीय ठरले आहे. निसर्गलेखक मारुती चितमपल्ली यांच्या ललित लेखनाने मराठी साहित्यात निसर्ग चित्रणाची हिरवी वाट निर्माण केली. निसर्ग आणि माणूस यांच्यातील नात्याचा शोध त्यांच्या ललित प्रतिभेने घेतला. 'वनविद्येचे तत्त्वज्ञ ललित गद्यकार' म्हणून त्यांना समीक्षकांनी गौरविले आहे. चितमपल्ली यांच्या ललित लेखनाचा, त्यांच्या वनविद्येच्या अभ्यास व संशोधनाचा गौरव त्यांना अनेक झळकती मानचिन्हे देऊन करण्यात आला. तीन वेळा महाराष्ट्र राज्य पुरस्कार तसेच महाराष्ट्र शासनाचा विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार (2016), दमाणी साहित्य पुरस्कार (1991), फाय फाउंडेशन पुरस्कार (1991), अखिल भारतीय मराठी विज्ञान परिषदेचा सन्मान (1996), महाराष्ट्र फाउंडेशनचा गौरव पुरस्कार (2003), वेणू मेमन लाइफटाइम अचीवमेंट अवॉर्ड (2007), नागभूषण पुरस्कार (2008), वसुंधरा सन्मान (2009), भारती विद्यापीठ जीवनसाधना पुरस्कार (2013) अशा अनेक सन्मानांचे ते धनी ठरले. 1987 साली नाशिक येथे झालेले पहिले पक्षिमित्र संमेलन, 2000 साली औदुंबर येथे झालेले 57 वे विदर्भ साहित्य संमेलन, 2000 साली उमरखेड येथे झालेले 51 वे विदर्भ साहित्य संमेलन आणि 2006 साली सोलापूर येथे झालेले 79 वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, या सर्व संमेलनांच्या अध्यक्षपदाचा बहुमान त्यांना लाभला आहे.




सोलापुरातील टी. एम. पोरे स्कूल व नॉर्थकोट टेक्निकल हायस्कूलमधून शालेय शिक्षण आणि दयानंद महाविद्यालयातून उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर पुढील व्यावसायिक शिक्षण त्यांनी स्टेट फॉरेस्ट कॉलेज, कोईमतूर आणि बंगळुरू, दिल्ली, कान्हा राष्ट्रीय उद्यान (मध्य प्रदेश), डेहराडून येथील वने आणि वन्यजीवविषयक संस्थांमधून घेतले. नांदेड येथील संस्कृत पाठशाळेत तसेच पुणे, पनवेल येथील संस्कृत पंडितांकडे संस्कृत भाषेचे व साहित्याचे अध्ययन केले. जर्मन व रशियन भाषांचाही त्यांनी अभ्यास केला.

महाराष्ट्र शासनाच्या वनविभागात ढेबेवाडी ते मेळघाट अशी तीस वर्षे त्यांनी सेवा केली. मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या उपसंचालक पदावर कार्यरत असताना 1990 साली ते सेवानिवृत्त झाले. कर्नाळा पक्षी अभयारण्य, नवेगाव राष्ट्रीय उद्यान, नागझिरा अभयारण्य आणि मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या विकासात त्यांचे विशेष योगदान आहे. ■ ■



विलास गजभिये
मो. 9421588901

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर के अस्तिन के साप

# माहितीपूर्ण वैचारिक ग्रंथ

*'डॉ. बाबासाहेब आंबेडकर के अस्तिन के साप' हा प्राचार्य भाऊ वासनिक यांचा हिंदी भाषेतील वैचारिक ग्रंथ सम्राट अशोक विजयादशमी-ऑक्टोबर, 2024 ला प्रकाशित झाला आहे. यात एकूण 48 प्रकरणांचा समावेश आहे.*

खरेतर बाबासाहेबांच्या क्रांतिकार्याला जगाच्या इतिहासात तोड नाही. तरीसुद्धा डॉ. बाबासाहेबांसारख्या प्रज्ञासूर्यावरही काहींनी टीका करण्याचा प्रयत्न केला. ही अत्यंत वाईट घटना आहे. डॉ. बाबासाहेबांवर त्यांच्या वडिलांचा मोठा प्रभाव होता. डॉ. बाबासाहेबांचे वडील लष्करात असल्यामुळे ते शिस्तीचे भोक्ते होते. स्वाभाविकपणे तेच संस्कार त्यांनी डॉ. बाबासाहेबांवर केले. सदर ग्रंथाच्या माध्यमातून लेखकाने विविध प्रकरणांच्या माध्यमातून वस्तुस्थिती कथन केली आहे. डॉ. बाबासाहेबांच्या जीवनात अनेकांचे सहकार्य लाभले आहे. बडोद्याचे राजे सयाजीराव गायकवाड यांच्या शिष्यवृत्तीमुळे बाबासाहेब विदेशात उच्च शिक्षण घेऊ शकले.




खरेतर डॉ. बाबासाहेबांना आपल्या आयुष्याच्या उत्तरार्धात बरेच कार्य करावयाचे होते. मात्र प्रकृती त्यांना साथ देत नव्हती. माता 'रमाई'च्या निधनानंतर तेरा वर्षे पर्यंत बाबासाहेब एकटे राहिले. मुंबई, दिल्लीच्या तज्ज्ञ डॉक्टरांनी वेळेवर भोजन आणि औषध याची काळजी घेण्यासाठी नर्स अथवा महिला डॉक्टर ठेवण्याचा त्यांना सल्ला दिला. खूप विचारांती त्यांनी 1948 साली डॉ. सविता कबीर यांच्याशी पुनर्विवाह केला. यासंदर्भात अनेक महत्त्वाची कारणे सुद्धा दिलेली आहेत. या कालावधीत बाबासाहेबांनी अनेक महत्त्वपूर्ण कार्य देश हितासाठी केले. याविषयीची विस्तृत माहिती सदर ग्रंथात लेखकाने दिली आहे.

डॉ. बाबासाहेबांनी केलेले सकारात्मक स्वरूपाचे कार्य लोकांपर्यंत पोहोचविण्याचा अनेक विचारवंतांनी प्रामाणिकपणे प्रयत्न केला. लेखक भाऊ वासनिक यांच्या मते, काहींनी 'अस्तिनितील साप' बनून माईसाहेबांच्या आड बाबासाहेबांशी आणि समाजाशी चुकीचे वागण्याचा प्रयत्न केला, असे लेखकाला वाटते. तेव्हा अशा अपप्रवृत्तींचा समाचार घेण्याचा प्रयत्न सदर ग्रंथातून लेखकाने केला आहे. लेखकाच्या मते, बाबासाहेबांसंबंधी तथ्यावर आधारित सत्य माहिती पोहोचविणे गरजेचे आहे. तसेच कोणत्याही प्रकारचे समाजात गैरसमज असू नये, असे त्यांना वाटते. अर्थातच वास्तविक तथ्य बाबासाहेबांच्या अनुयायांनी समजून घेणे गरजेचे आहे. याविषयी संपूर्ण ग्रंथात लेखकाने विस्तृत माहिती कथन केली आहे. त्यामुळे वस्तुस्थिती समजून घेण्यासाठी सदर ग्रंथ प्रत्येकाने मुळातून वाचणे अत्यावश्यक आहे. तसेच हा ग्रंथ आपल्या संग्रही ठेवणे गरजेचे आहे. आगामी पिढ्यांपर्यंत कोणतीही चुकीची माहिती जाऊ नये, हा लेखकाचा उद्देश असून त्यांनी ग्रंथाच्या प्रारंभी स्मरण करून दिले आहे.

'डॉ. बाबासाहेब आंबेडकर के अस्तिन के साप'
(वैचारिक ग्रंथ)
लेखक- प्राचार्य भाऊ वासनिक
(मो. 9423606064)
प्रकाशक- पिपल्स पब्लिकेशन, तळेगाव दाभाडे, तहसिल- मावळ, जिल्हा- पुणे-4410507
सहयोग राशी-300/-रुपये, पृष्ठ-208 ■ ■

समीक्षा



दिनेश कोटांगले
मो.9834492541

# 'माणूस' म्हणून हाकेच्या प्रतिक्षेत असणारी कविता




सामान्य माणसाचे हे कन्फ्यूजनगत अवस्थेमागील विषारी पाळेमुळे कविला अस्वस्थ करतात. कायम संशयिताच्या कटघऱ्यात उभे करणे जीवघेणी वेदना ठरते. वेदनेला पीळ देऊन वेदना कोरडीही करता येत नाही उलट पीळ देताना ज्या वेदना होतील त्या वेगळ्याच आणि म्हणून कवी लिहितो, बोलतो, स्वतःला आंदोलितही करतोय एक माणूस म्हणून. पण तरी इथे मुसलमान असणे म्हणजे कायम असुरक्षितेच्या सावटाखाली जगणे. ही भीती डोके वर काढतेच तेव्हा अम्मीच्या स्वरात ती बोलते 'मोहरम आणि नवरात्र आलेय, यंदाही एकत्र म्हणून घरी येत जा रात्री. कश्याची काय न्हाई बग खात्री.'

'असिफा'साठी निषेध नोंदवतांनाही केला जाणारा भेद, न्याय अधोरेखित करतांना कवी म्हणतो, 'असिफा तुझे नाव वेगळे असायला हवे होते.' ही ओळ हृदयावर चरकन ओरखडा ओढते आणि भेदाची अतुच्च सीमा दर्शविते. निषेध नोंदविण्यापुरतीही कविता हतबल होताना दिसते.

*'फ्यूजनकन्फ्यूजन' हा साहिल कबीर यांचा कविता संग्रह अलीकडेच वाचला. आज फ्यूजनचा काळ. नव्या जुन्याला एकत्रित करणारा म्हणून प्रसिद्ध पावलेला. पण विषमतावादी सामाजिक व्यवस्थेतील हा फ्यूजनवाद, शोषणाची परंपरा कायम ठेवण्यासाठी राष्ट्रवादाचा नवा रुपडा लावून आलेला अधिक घातक, क्रूर असाच वाटतो. तो रीतसर येथील मानवी जगण्याला पुन्हा एकदा धार्मिकतेच्या तराजूत जगण्याचा विषय बनवू पाहतोय आणि सामान्य माणूस सहिष्णू - असहिष्णूतेला अलगत पुन्हा तोलू मापू पाहतोय.*

भारतातील कोणताही समुह स्वतःला समाजवादी, लोकशाही, धर्मनिरपेक्ष या संवैधानिक व्यवस्थेच्या बाहेरचा समजू शकत नाही. ही व्यवस्था सर्व माणसांना एकत्र बांधून तिचे संचलन करते. प्रत्येक नागरिकाला तुम्ही प्रचलित धर्माचे आहात असे संविधान समजत नाही. हा सेक्युलर विचार आहे. या सेक्युलर विचारांच्या माध्यमातून संविधान धर्माच्या नावाने येणाऱ्या अंधश्रद्धा, शोषण, विषमता यांचा विरोध करते. आधुनिक मानवी मूल्यांचा जो धर्म विरोध करतो तो धर्म संविधान मानत नाही. यालाच इहवाद म्हणतात. जो आपल्या संविधानाने स्वीकारला आहे. जो विज्ञानाच्या कसोटीवर सिद्ध होणारा विचार आहे. धर्मस्वातंत्र्याचा जो हक्क आहे त्यावरील हा लगाम (सेक्युलर विचार) आहे. म्हणजेच संविधानातील चेक अँड बॅलन्सचे तत्व आहे. तरी या संविधानाने स्वीकारलेल्या इहवादी तत्वाला इथे वेळोवेळी कशी बगल दिली जाते. नव्या राष्ट्रवादाचे धर्माभिमानी झुंडी सहिष्णूतेला कसा रामराम ठोकतात हे कवी नेमके 'सहिष्णूतेचा रामराम आला रे, तुझ्या हक्काचा घपला रे' म्हणत हेरतोय.

'सेक्युलॅरिझमच्या परीक्षेचा भयभीत बारमाही विद्यार्थी' आरोपी फिलिंग गडद करणाऱ्या ओळी नेमक्या शब्दात कवी अनुभवायला देतोय. त्या अनुषंगाने येणारे ऐतिहासिक संदर्भ या कवितांमधील वैशिष्ट्य ठरतात. कविता नोंदी घेत समोर समोर येतेय आणि समाज वास्तव्याचे भयाण पात्रच वाचकांसमोर उभे करतेय आणि माणूस असणारा प्रत्येक वाचक हा कविबरोबर अस्वस्थ होतोय. या कविता संग्रहातील नव्या प्रतिमा, प्रतीके येथील समाज वास्तवतेची प्रिंट अधिक स्पष्ट दिसण्यासाठी उपयुक्त ठरतात. नव्हे समाजाचा एक्सरे त्या काढतात. 'मॉबलिन्चिंगचा लाईव्ह मरणोत्सव' दाखवतात आणि 'संस्कृतीच्या गोंडस नावावर मृत्यूलेख लिहिणाऱ्या हातांना होऊ दे असाध्य आजार' अशी मागणी ही निराकाऱ्याला करतात. येथील 'हंगामी हळवेपणा' 'महानतेच्या ओव्या', 'व्यथांचा व्हर्चूअल उरूस' 'मिरवचूक' 'भय जिवंत ठेवू' 'उसना अभिनिवेश' अश्या अनेक प्रतिमांतून उपरोध, उपहास पानोपानी दिसतो. ही शैली कवितेचे वैशिष्ट्ये म्हणता येईल. आतला दवंद, चीड, चाड दिसू नये इथल्या विषारी व्यवस्थेला म्हणून कवी स्वतःलाच समजावताना म्हणतो,

*'आंबेडकरांना रहबर म्हणतोस,*
*ढसाळ तुकोबाला गुणगुणतोस*
*आक्रोश दिसतो चेहऱ्यावर*
*दाढी ट्रिम करत जा.'*
*तसेच तो बघतो*
*'ऋतू मरणाचाय हे कळो आल्या*
*बहाद्दरांच्या आतड्याची*
*वाढवून ठेवली जातेय भूक'*
*तेव्हा प्रश्न करत कवी म्हणतो -*
*'मलाच नेस्तनाबूत करत राहतात*
*बेचिराख वास्तूंचे उद्धवस्त अवशेष*
*सगळेच सहिष्णूतेच्या मारताहेत गप्पा*
*मी घूसमुटून भरून काढतो अनुशेष'*

या समग्रहातील संपूर्ण कविता या माणूस म्हणून जगू पाहणाऱ्या पण विशिष्ट्य धर्माचे म्हणून ते जगणे नाकारणाऱ्या माणसांचे आत्मकथनच म्हणावे असे आहे. 'संशयी डोळ्यांना शब्दांनीच फोडण्याची ताकद दे' म्हणणारी ही कविता आहे. 'आकार, प्रकार, रंग, गंध, बंधमुक्त सामीलकी, मोकळीक, बांधिलकी, स्वातंत्र्य, सीमा, स्वैराचार किंवा कश्यातही असू नये इतके व्यापक जगणे दे, माणूस दे, माणूसपण दे' (फार्मलेस) म्हणणारी ही कविता माणूसपण लाभावे म्हणून टाहो फोडणारी आहे. या कविता तीन भागात येतात. एक - सोलोसले, दोन - रोमान्सपसारा, तीन - शंकाभयाच्याबाता.

या कविता रूढ वाङमयिन क्षेत्रातील सौंदर्यशास्त्र नाकारतात. त्या स्वतःच जाणींवांचे नवे सौंदर्यशास्त्र हुडकतात. नाकारलेपणाच्या, कायम संशयित म्हणून कटघऱ्यात उभे केल्याच्या दुःखाच्या वेदना उरी कवटाळून कवी जे लिहितो त्याला पारंपारिक सौंदर्यशास्त्राच्या बंधनात कसे बसविता येईल. असे करणे म्हणजे एखाद्याची कबर स्वतःच खणायची आणि त्यावर एक रोपटे स्वतःच लावायचे असे होईल. हेच 'फ्यूजनकन्फ्यूजन' आहे. हेच कवी धुडकावून लावतो. हाच तो विद्रोह आहे आणि हा विद्रोह कविता संग्रहाचा प्राण आहे. दुःखाचे हे नवे सौंदर्यशास्त्र आहे असे म्हणता येईल.

ही साहित्य क्षेत्राच्या दृष्टीने अर्थात जी आधुनिक मानवी मूल्यांचा पुरस्कार करते, त्यासाठी मोठी गोष्ट आहे. शेवटी कवी हा कविता संग्रह **'वो सुबह कभी तो आयेगी'** या आशेवर मरणाऱ्या सगळ्यांना अर्पण करतो आणि एक भयाण शांतता वाचकाला अनुभवायला देतो. मी साहिल कबीर यांच्या लेखणीच्या धाडसाला सलाम करते. कारण, **'बंदिये बोलायला लिहायला बघायला पाहायला सत्यखरे'** तरी हा कवी लिहतोय.'प्रेम नावाच्या जहराचे मोहमळे बहरू दे' म्हणत, सवालही करतो तुम्हा आम्हाला की, 'नेक माणसे मरू देत की उरू देत?

हा सवाल खरे तर जगण्याची दिशा व आशेची ची ती 'सुबह' दाखवणारा खरा सवाल आहे.

मी सदिच्छाही व्यक्त करते की ती मंगल सुबह नक्की येवो आणि ही लेखणी माणसाचे सूक्त रचित जावो. जे तिचे मूळ प्रयोजन आहे.

कविता संग्रहाचे नाव - फ्युजनकन्फ्यूजन
कवी - साहिल कबीर
प्रकाशन - शब्द पब्लिकेशन
मूल्य - 260/- ■ ■



माधुरी वसंतशोभा
9049329350

# धम्मकार्य प्रवचनसाठी भ्रमंती करणारे

**गेल्या रविवारी 15/6/25 सकाळी सम्यक कोकण कला मंच या वॅट्सअप ग्रूपवर बातमी वाचली. ज्येष्ठ बौद्धाचार्य नारायण जाधव यांचे निधन. बातमी पुन्हा पुन्हा वाचली. काही संबंधित कलावंत यांच्याशी संपर्क केला. कवी गायक मंदार कवाडे यांनी ही बातमी खरी आहे सांगितली.**

धम्म कार्यासाठी, सामाजिक चळवळीसाठी आणि प्रबोधनासाठी वयाच्या एकोणऐंशी वर्षातही धावपळ, भ्रमंती करणारे नारायण जाधव दादा यांनी आपल्या पद्धतीने माझ्या माहितीप्रमाणे जवळपास पंचेचाळीस वर्ष स्वतःला झोकून दिले होते. हे सर्व करत असताना आपली नोकरी आणि कुटुंब याकडे त्यांनी दुर्लक्ष केलेले नाही. ते उत्तम प्रवचकार होते. त्यांना कविता, गाणी लिहिण्याची गाण्याची आवड होतीच. पण जिथे सभा, मेळावा, मोर्चा, संमेलन, कव्वाली, असेल तिथे यांची उपस्थिती आवर्जून असायची, या दादांची आणि माझी ओळख 1987 पासूनची. कारण मी मुंबईत अंधेरी मरोळ गावात राहत होतो. जोगेश्वरी इस्माईल युसूफ कॉलेजात कपाऊंडरची नोकरी करून शिकत होतो. डॉक्टरांचा एक दवाखाना मरोळ आणि दुसरा सहार गावात जाधव दादा राहत तिथे जवळच होता. सकाळी साडेदहा ते साडेबारा वाजेपर्यंत तिथे ड्युटी दुपारी रात्री मरोळ गावात. त्यामुळे सहार गाव येथील नालंदा बुद्ध विहारातील कार्यक्रमामध्ये माझी हजेरी असे तिथेच मला जाधवदादा भेटले. पण त्यांची माझी खरी मैत्री जमली ती अंधेरी जोगेश्वरी परिसरातील धम्मसंस्कार करणारी काही मंडळी एकत्रित येऊन आजुबाजूच्या परिसरातील विहारात, वस्तीत जावून बौद्ध धम्म, ग्रंथ त्यातील विषयावर हे सर्वजण प्रवचने देत, धम्म चर्चा करीत असत. मी राहत असलेल्या मरोळ येथील आनंदा बुद्ध विहारात मी विद्यार्थी दशेत छोट्या मुलांना, विद्यार्थी यांना घेऊन सायंकाळी धम्म गाथा घेत असे. मी काही उपासक नव्हतो. पण आदर्श तरुण मंडळाचा सक्रिय कार्यकर्ता होतो. बौद्धाचार्य मुकुंद महाडीक, रमेश मोहिते, ना. ल. मोरे, कृष्णा गमरे ही मंडळी दर रविवारी वेगवेगळ्या ठिकाणी जात असत. मरोलच्या विहारात माझे गाथा पठण या सर्वांना आवडले. वर्षावासात ही मंडळी सर्वत्र जात. मलाही या सर्व मंडळींनी आपल्या सोबत येण्याचे सूचित केले आणि मीही त्यांच्यात सहभाग घेतला. एखाद्या धम्म गीतातूनही प्रबोधन करत असे. मी पदवीधर झालो. त्यानंतर गावी शिक्षक म्हणून आलो तरी मुंबईत या सर्व लोकांशी माझा संपर्क होता. आजही आहे. नारायण जाधव यांच्याशी वयात पंचवीस तीस वर्षाच अंतर असेल तरी माझी मैत्री जमली. त्याला कारण बौद्धाचार्य, कवी, श्रामणेर होते. पण यांना गाण्याची आवड होती. निळजे, तालुका कल्याण, जिल्हा ठाणे हे त्यांचे मूळ गाव असले तरी वडील सहार गावी स्थायिक झाले. तिथेच आई सावित्रीबाई आणि वडील रामचंद्र ठणकाजी जाधव यांच्या पोटी तीस जुलै 1946 रोजी त्यांचा जन्म झाला. लिहिण्यावाचण्या पुरते शिक्षण झाले. गॉड फे फिलिप्स इंडिया सिगारेट फॅक्टरीत त्यांनी सव्वीस वर्षं नोकरी केली. पत्नी मनिषा नारायण जाधव यांची उत्तम साथ मिळाली. त्यामुळे मुलगा संदीप, एयर इंडिया मध्ये आणि मंगेश चांगल्या ठिकाणी नोकरी करत आहेत. मुली शर्मिला शरद गायकवाड, पल्लवी सुरेश सोनवणे, सुमन धनंजय तेदणे, या सर्वांची मुले चांगली शिक्षण घेत आहेत. एखाद्या व्यक्तीला शिक्षण कमी असले तरी मनात प्रबळ इच्छाशक्ती असेल तर ती समाजासाठी वेळ देऊ शकते. त्यातीलच जाधवदादा एक होते. 1987 पासून रिडल्स, नामांतर मोर्चा, नेत्यांचे ऐक्य, डॉ. बाबासाहेबांचे जन्मशताब्दी वर्ष, इंदू मिल आंदोलन, बौद्धजन पंचायत समिती गट, महापरिनिर्वाण दिनी नियोजन, बाहेरगाहून आलेल्या मंडळींसाठी चपाती, सुकी भाजी, चटणी जमा करण्यात पंचायत, मंडळ मार्फत मीही अशा मंडळींसोबत तेव्हा सहभाग घेतला आहे. समाजाचे आपण देणेकरी आहेत. समाजात बसले, फिरले पाहिजे, असे संस्कार अनुभव मी माझ्या कुटुंबातून आणि अशा लोकांच्या सहवासातून शिकलो आहे. प्रवचन, भाषण कसे द्यावे, विषय कसा मांडावा यांवर आम्ही चर्चा करत असू. हल्ली मोबाईलवर सुद्धा दादा माझ्याशी गप्पा मारत, चर्चा करत, ते जिथे प्रवचन, व्याख्यान देत तिथले शूटिंग, व्हिडिओ मला पाठवित आणि आदराने विचारत काय चूक असेल तर सांगा. कारण मी अल्पशिक्षित आहे म्हणत. त्यांनी सारीपुत्त मोगलांन, भीमाई आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सावत्र आई जिजाबाई या विषयावर ते प्रवचन देत असत. आपण जेष्ठ, अनुभवी आहेत. नवीन लोकांना काय विचारू? असा त्यांचा कधीच आविर्भाव नव्हता. शांत, संयमी स्वभाव, दुसऱ्याचे कौतुक करणे. वॉट्स अप ग्रूपवर मी पाठवीत असलेले लेख, चांगली बातमी याबद्दल ते मला फोन करून कौतुक करत. शाबासकी देत. माझ्या तालुक्यात प्रवचनसाठी येण्याची त्यांची इच्छा होती. पण वेळ नियोजनमुळे ते शक्य झाले नाही. पंचायत समिती आणि चैत्यभूमी परिवार. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कुटुंबाविषयी त्यांना विशेष आदर होता. सम्यक कोकण कला संस्था, बहुजन हितवर्धक कला संस्था त्यातील पदाधिकारी, कलावंत यांच्याविषयी त्यांना आदर होता. कवी मंदारजी कवाडे, संतोष गमरे, नाना सकपाळ अशा सर्वच कवी गायक यांचे ते कौतुक करत असत. यावर्षी एप्रिल तेरा रोजी माझ्या पुस्तक प्रकाशनसाठी उभयता येणारे होते. त्यांना शक्य झाले नाही म्हणून त्यांनी स्वतः फोन केला आणि शुभेच्छा पत्र पाठवून माझे अभिनंदन केले. त्यांनी स्वतः आपल्या जन्म दिनाच्या तारखेचे औचित्य साधून दोन कविता संग्रह लिहिले आहेत. 'बाबासाहेब तुमच्यामुळे' 30जुलै 2011 आणि दुसरा 'तुझ्या छायेखाली' 30जुलै 2017. माणूस किती जगला यापेक्षाही तो कसा जगला, कुटुंबासोबत त्याने समाजाला काय दिले याचे मोजमाप केले तर जाधव दादांनी आपल्याला जे सुचले, योग्य वाटले ते देण्याचा, सांगण्याचा तळमळीने प्रयत्न केला. त्यांना डॉ. बाबासाहेबांच्या आई भिमाई, आणि जिजाबाई म्हणजे डॉ. बाबासाहेबांच्या सावत्र आई यांच्याविषयी पुस्तके लिहिण्याची इच्छा होती. राष्ट्रपाल, तुम्ही मला सहकार्य करा. कारण साहित्यातले तुम्ही अभ्यासक तुम्हांला लेखन कला चांगली अवगत आहे म्हणाले आणि तुम्ही शोधक पद्धतीने योग्य लेखन करत आहात. त्यामुळे तुम्ही तरी पूर्ण अभ्यासावरुन या संबंधित पुस्तक लिहा म्हणाले. त्यांची इच्छा अपुरीच राहिली. मुंबईत आलो तर तुम्हाला समक्ष भेटायला येईन असे त्यांना सांगितले. मात्र मला ते शक्य झाले नाही यांची खंत मनात राहिली. अल्पशिक्षित जाधव दादा धम्म कार्य सामाजिक कार्यात, वाचन, लेखनात, प्रवचने देण्यासाठी सतत सक्रिय राहिले.

नवाकाळ, सम्राट, बहुजन नायक, या दैनिक काही साप्ताहिक आणि सध्या वॉट्स ॲप वरून लिहित राहिले. त्यांची एक कविता मला खूप भावली, 'आई ग आई ग मला गर्भात मारू नको माझा गुन्हा तरी काय? मला समजत नाय अशी निर्दयी होऊ नको.' सहार, मरोळ भागात मी ही शेती पाहिली आहे. आज तिथे मोठ मोठे टॉवर झालेत, फार बदल झालाय ते 'सहार गाव' या कवितेत लिहितात, 'कुठे गेला माझा सहार गाव' यात त्यांनी शेती, बांधावरून चालत येणे, आंबा पेरूची चिंचेची झाड, मिठी नदी या परिसराच सुंदर वर्णन लिहिल आहे. यालाच धम्म निष्ठा सामाजिक तळमळ म्हणतात. दादांना भावपूर्ण श्रद्धांजली! ■ ■




नारायण जाधव



राष्ट्रपाल भा. सावंत
मो. 9403144356



## काव्यफुले

संयोजक : प्रा. भीमराव गायकवाड
मो. 9822507225

बहुजन सौरभ

### दुबार पेरणी

मृग कोरडाच गेला, थोड्या पडल्या रोहिणी.
सुकल्या मृगाच्या खारी, आता दुबार पेरणी.
पहिल्या पेरणीत सरले, सर्व हातचे बियाणे,
मन ग्रासले चिंतेने, कसे पैशाचे उभारणे.
जुन्या संदूकात होती, एक सरद्याची नथणी,
ठेवली गहाण पेढी कडे, केली दुबार पेरणी.
सकाळीच धनी माझा, रोज वावराकडे जाऐ.
सुकत्या पेरणीकडे पाहून, टक आभाळाला पाहे .
काही बोलत नव्हता, नुसता उगामुगा राहे,
करू रातभर जागली, त्याचे मनी काय आहे .
हात पिवळे करीन म्हणे, छकुलीचे अवंदा.
पिक पाऊसाचा अंदाज, करे स्वप्न चेंदामेंदा.
काल दुपारच्या वक्ताला धावत आल्या वन्यारणी,
फासी लिंबाच्या झाडांला लागला तुमचा घरधनी.
सारा गाव जमा झाला, रडे टाहो फोडून फोडून.
नाही पसीजला आसमंत अश्रू वाहती ओसंडून.
अरे निष्ठूर निसर्गा सांग, कुठे मुकदमा करू.
शेतकऱ्यांच्या आत्म्याला नाही जगु देत ना मरू.

- चित्तरंजन चौरे

### भरपगारी सुट्टीचा अर्ज

प्रसुतीच्या भरपगारी सुट्टीचा अर्ज भरता भरता
तिने माझे कामाचे आठ तास संपले
म्हणत बॅग भरली
भरगच्च बस मध्ये ती चढताच
राखीव जागा रिकामी झाली
मैत्रिणीच्या गप्पा रंगल्या होत्या
कामगार दिनाच्या
अन् कामगार नेत्यांच्या !
तिच्या फोनवर आलेला मागील कंपनीचा
पीएफ जमा झाल्याचा संदेश वाचता वाचता
ती निर्लज्ज बाई कामगारांचा अन्
बाबासाहेबांचा काय संबंध म्हणाली.....

- अश्विनी भिवगडे

### बाबासाहेब

बाबासाहेब !
तुम्हीच आमच्या अस्तित्वाचे मुळ
तुम्हीच आमच्या जाणिवांचे सूर्यकुळ
तुम्हीच आमच्या मेंदूतली प्रज्ञा
तुम्हीच आमच्या जगण्याची करूणा
तुम्हीच आमच्या लढण्याची प्रेरणा
बाबासाहेब !
तुम्हीच आमच्यात माणूस पेरला
तुम्हीच आमच्यातला निखारा हेरला
तुम्हीच दिला बुध्द आणि धम्म
तुम्हीच झालात अंधारातल्या
प्रकाशवाटा
तुम्हीच दिलीत लेखणी आमच्या
हातात
तुम्हीच शिकविलेत उडायला
आकाशात
बाबासाहेब !
तुमच्या क्रांतीनेच आमच्या जीवनाची
सदाफुले झाली
तुम्ही लावलेले उजेडाचे झाड अखिल
मानवासाठी भाकर झाली
बाप हा बाप असतो, तुम्हीच आमचे
मुक्तीदाते
बापाची सर कुणालाच कधी येत
नसते
बाबासाहेब !
आमच्या हृदय आणि मेंदूतील
तुमचे स्थान अढळ आहे
तुम्ही तर तुमच्याच कर्तृत्वाने मोठे
आहात
तुम्हास मोठे करण्याची आमची काय
बिशाद आहे?
फक्त तुमच्या कार्यास वाहून घेऊ
इच्छितो
चळवळीच्या रथाला पुढे नेऊ इच्छितो
बाबासाहेब !
तुमच्याच प्रज्ञेच्या पाण्याने
रोपट्यांना सिंचण्याचे काम करू
इच्छितो
त्रिवार 'जयभीम!' उच्चारून
झोपलेल्यांना जागे करू इच्छितो.

- अरूण विघ्ने

### तवा दुःखते त्या बामनाच्या पोटामधी

काय सांगू बाई तुले । जवा जोती माहा बोले वो ।।
धोतर, फेटा, कोट घालून । इंग्लीश मधी ।।
अनं तवा दुःखते त्या बामणाच्या पोटा मधी । धृ।।
वरनरच्या मिटिंगला । गेला माहा जोती बी ।।
अडविले जोतीबाले दारी पायरेकरी वो ।
दूसे मारुन जोतीबा, गेला आंत मधी वो ।
फाड फाड मंग बोले; इंग्लीश मधी ।। 1।।
हिज एक्सीलेन्शी; दि राईट आनरेबल सर ।
फेडरिक, टेम्पल, हे मिल्टन ब्लेकवुड अर्ल ऑफ डफरीन,
के.पी. सी.सी.बी.जी.सी.एम.जी. एफ.आर. डी.सी.आई.
विक्टोरी ऑफ गवरनर जनरल ऑफ इंडीया ।
आय. एम. जोतीराव गोविंदराव फुले ।।
फाड फाड मंग बोले; इंग्लीश मधी ।। 2।।
चकीन झाले गवरनर उठवले भटालाः ।
बसवले जवळ त्यांनी माझ्या जोतीबाले वो ।
समजून घेतले प्रश्न सारे, सांगितले महाराणीला । इंग्लीश मधी ।। 3।।
शेतकऱ्यांचे होते प्रश्न, विचार केला महाराणीने वो ।
असे किती कौतुक सांगू माह्या जोतीबाचे वो ।।
हो म्हणे बाई माझे, ठेव थोडे ध्यान ।
शिक्षण घे बाई इंग्लीश मधी ।। 4।।

- हरीकिसन हटवार




## अष्टशिल बुद्ध विहार

शिवणकर नगर, नागपूर पुर्व. स्थापना सन 1993. विहार बांधतांना फार मोठा संघर्ष करावा लागला. अध्यक्ष पंकज काळबांडे, उपाध्यक्ष बिट्टू तंत्रपाळे, सचिव दिनेश तंत्रपाळे व कोषाध्यक्ष घनश्याम डोईफोडे आहेत. दररोज वंदनेला प्रामुख्याने महिला उपस्थित असतात. थोर पुरूषांच्या जयंती, स्मृती दिनानिमित्त विविध कार्यक्रम होतात. गिता मेश्राम, अर्चना तंत्रपाळे, रूपाली गाडेकर, निशा काळबांडे आदी महिलांचा सहभाग असतो.

संवाद मित्र, हरिदास बेलेकर
मो. 9372421695

# जिजामाता उद्यानात फालुन दाफा

**नागपूर :** छत्रपती नगर चौक येथील जिजामाता उद्यानात गेल्या तीन वर्षापासून सुप्रभात योगा व डान्स करीत आहेत. आज जागतिक योगा दिनानिमित्त फालुन दाफा मन आणि शरीराची साधना या ग्रुपला निमंत्रित केले होते. सागर कांबळे, युवराज तेलंग, राजू डबले, विमल, इंदिरा, कल्पना, डॉ. यशोधरा व संध्या राजुरकर यांनी फालुन दाफाबाबत प्रात्यक्षिक करून दाखविले तसेच माहिती दिली. संगीता नरवाडे, मिरा मदनकर, विभा नक्कनवार, सुप्रीया काळे, मंगला फूसे, सूहास कानडे आणि कल्पना कांबळे स्वागत केले. आभार प्रदर्शन सूहास कानडे यांनी केले. सर्वाचा कार्यक्रमाला छान प्रतिसाद मिळाला. फालुन दाफाचे सर्व टीमचे खुप खुप धन्यवाद मानते. आम्हाला छान माहिती फालुन दाफा विषयी सर्वांना खूप छान वाटले. असे उपस्थित महिला व पुरुष यांनी सांगितले. कल्पना कांबळे, सुहास कानडे, प्रेमीला गोंद्रे,





मीरा मदनकर, सुजाता मेश्राम आदींनी सहकार्य केले. तसेच अलका निरंजन आणि शिरीष कांबळे आवर्जून उपस्थित होते.

# अभियांत्रिकी व तंत्रनिकेतन महाविद्यालयात योग दिन

### संवाद मित्र अनिलकुमार पालीवाल

**चोपडा :** 21 जून 2025 'महात्मा गांधी शिक्षण मंडळ' संचलित शरच्चंद्रिका सुरेश पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (इंजिनिअरिंग × पॉलिटेक्निक), चोपडा येथे अकरावा आंतरराष्ट्रीय योग दिवस उत्साहात आणि उत्सवमूर्त वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात योगाभ्यास सत्राने झाली, ज्यात विद्यार्थ्यांसह प्राध्यापक, कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले. महाविद्यालयीन योग प्रशिक्षक यांच्या



मार्गदर्शनाखाली विविध योगासने, प्राणायाम आणि ध्यानधारणा याचे प्रात्यक्षिक घेण्यात आले. या प्रसंगी त्यांनी योगाचे शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर होणारे फायदे स्पष्ट केले.

दररोज योगसाधनेचे महत्त्व अधोरेखित केले. महाविद्यालयाचे प्राचार्य व्ही. एन. बोरसे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, 'योग हा भारताचा अमूल्य वारसा आहे. तंत्रज्ञान आणि शिक्षणाच्या जोडीने जर आपण आरोग्याकडेही लक्ष दिले, तर एक सशक्त आणि संतुलित समाज उभा राहू शकतो.' कार्यक्रमाचा समारोप सामूहिक ध्यान आणि 'योग दिन' या संकल्पनेमागील उद्दिष्टांची आठवण करून देत करण्यात आला.

# पुज्य डॉ. भदन्त आनंद कौसल्यायन यांच्या 37 व्या पुण्यस्मरण दिन



**नागपूर :** बुद्धभुमी महाविहार पुज्य डॉ. भदन्त सावंगी मेधंकर स्मृती परिसर येरखेडा/खैरी कामठी रोड ता. कामठी, जिल्हा नागपूर.

बौद्ध प्रशिक्षण संस्थानच्या वतीने परिनिब्बुत पुज्य डॉ. भदन्त आनंद कौसल्यायन यांच्या 37 व्या पुण्यस्मरण दिन निमित्त आदरांजली कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून सकाळी 8-30 वाजता निवासी विद्यार्थ्यांना श्रामणेर दीक्षा प्रदान करण्यात येईल. 9-30 वाजता पुज्य भदन्त आनंद कौशल्यायन यांच्या स्तुपावर पुष्प अर्पण येईल. महाविहारात परित्राण पाठ, धम्मदेसना, भीक्खु संघास भोजन दान, संघदान व उपासक-उपासिका यांच्या करीता सामुहीक भोजन होणार आहे.

कार्यक्रमाला पुज्य भदंत सत्यशिल महास्थविर, भदंत सिवनी बोधानंद, महास्थविर भदंत अश्वघोष, महास्थविर भदंत प्रज्ञाज्योती, महास्थविर भदंत प्रियदर्शी महास्थविर, भदंत धम्मधर महास्थविर भदंत शिलरक्षित महास्थविर आदी भिक्खु संघ व बुद्धभूमी निवासी श्रामणेर संघ आणि दायक-दायिका उपस्थित राहतील. भदंत नाग दिपंकर महास्थविर यांनी कळविले आहे.

## महत्वाचे

### अलका अजय मेश्राम यांना संगीत विशारद




**नागपूर :** भारतीय शास्त्रीय संगीत क्षेत्रातील वटथाई इंडियन बुद्धिस्ट मोनेस्ट्रीच्या दायक विंगच्या सदस्य अलका अजय मेश्राम यांना संगीत विशारद सन्मानाने त्यांना अखिल भारतीय गंधर्व महाविद्यालय, मुंबई, तर्फे नुकतेच गौरविण्यात आले आहे. आठ वर्षाच्या अथक परिश्रम आणि समर्पणामुळे त्यांना ही पदवी मिळालेली आहे. भदंत नाग दिपंकर महास्थविर यांनी स्वागत केले आहे.

### आदिमांनी काढली व्यसनमुक्त रॅली



**नागपूर :** आदिम संशोधन-अध्ययन मंडळ व अस्तित्व क्रिएशन आणि एज्युकेशन एम्पायरमेंट ऑफ अंडरप्रिवीलेज्ड गर्ल्स फाऊंडेशन नागपूर यांच्या संयुक्त उपक्रमातून आज दि. 15 जून रोजी बिनाकी परिसरातील गल्लो गल्लीत फिरून शिबिरार्थीनी नारे लावत लोकांपर्यंत व्यसनमुक्तीचा नारा बुलंद केला. दारू सोडा = सुख जोडा, दारूची नशा = करी दुर्दशा, दारू, गांजां, जुव्वा, सट्टा = संसाराला लावती बट्टा, बिडी, तंबाखू, गुटखा = शरीर स्वास्थ्याला फटका. असे नारे लावून व्यसनमुक्तीचा संदेश देत होते. हरेश निमजे, प्रकाश दुलेवाले, घनश्याम निखारे, प्रदीप पौनिकर, विजय भनारकर आदिंच्या नेतृत्वात आणि पन्नासावर मॉनिटर यांच्या सामुहिक नेतृत्वात ही रॅली काढण्यात आली. यानंतर सामुहिक भोजनाचा (डब्बा पार्टी) आस्वाद घेण्यात आला. रॅलीचे ठिकठिकाणी स्वागत करून शिबीरार्थीना पुष्पगुच्छ व चॉकलेट देण्यात आले.

### जवाहर योग साधना व आरोग्य केंद्रातर्फे शेखर सावरबांधे यांचा सत्कार



**नागपूर :** 11 व्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त जवाहर योग साधना व आरोग्य केंद्र अंतर्गत पंकज बांते यांचे मुख्य मार्गदर्शन लाभले. त्या अंतर्गत जवाहर योग साधना व आरोग्य केंद्र नंदनवन तर्फे नवनिर्वाचित अध्यक्ष शेखर सावरबांधे जवाहर विद्यार्थी गृह नागपूर यांचा सत्कार करण्यात आला. अध्यक्षस्थानी ॲड. जगदीश गायधने प्रमुख पाहुणे व योग शिक्षक भरत मुंडले, घनश्याम कातोरे उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन कमलाकर हटवार तसेच आभार प्रदर्शन विजयराव लांबट यांनी केले. कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी किशोर कावडे, गोरले, डॉ. चंदनखेडे, रजनी वंजारी, मार्कंडे व इतर सर्व बंधु भगिनी यांचा मोलाचा वाटा लाभला.

### संतोष आडे 'जिजाऊ गौरव पुरस्काराने' सन्मानित



**अकोला :** येथील जिल्हा परिषदमध्ये समाज कल्याण विभागामध्ये कार्यरत असलेले कर्तव्यदक्ष अधिकारी संतोष आडे यांचे सामाजिक, सांस्कृतिक, साहित्यिक तथा कलावंतांना उत्तम मार्गदर्शन करून त्यांच्या अडी अडचणी दूर करीत असल्याने खेड्यापाड्यातील कलावंतांची आस्थेने विचारपूस करून त्यांचे सकारात्मक कार्याची दखल घेवून मदतीचा हात पुढे करत असल्याने न्यु महसुल कॉलनी खडकी बु. अकोला येथील मॉ जिजाऊ सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष पंजाबराव वर यांचे प्रमुख उपस्थितीत 'जिजाऊ गौरव पुरस्कार', मानपत्र, मोमेंटो, प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षतेखाली ज्येष्ठ कलावंत डी. जे. वानखडे, कलावंत बी. गोपनारायण, साहित्यिक अर्जून घुगे बंधू, मिलिंद बनसोड, वऱ्हाडी झटकाचे संपादक दिलीप दांदळे, क्राईम ड्युटीचे संपादक दीपक शिरसाट, अकोला मेट्रोचे संपादक संतोष मोरे, वाचनालयाचे सभासद ओरा चक्रे, कलावंत ॲड. प्रजानंद उपर्वट, कवी/गायक अनिल श्यामस्कर, रंजना संतोष आडे, जयश्री संतोष आडे, निर्भय रमेश राठोड आदींची उपस्थिती होती. सत्कार कार्यक्रमाचे संचालन ॲड. प्रजानंद उपर्वट यांनी केले तर आभार प्रदर्शन मॉ जिजाऊ वाचनालयाचे अध्यक्ष पंजाबराव वर यांनी मानले.

# विश्रूता चव्हाणची एमएच - सीईटी, नीट मध्ये उत्कृष्ट कामगिरी



**नागपूर :** राज्य सामाईक परीक्षाच्या CET सेल द्वारा सत्र 2025-26 शैक्षणिक सत्रासाठी घेण्यात आलेल्या विविध पदवी व पदवीत्तर अभ्यासक्रमाचे निकाल नुकतेच जाहीर झालेले आहे. यामध्ये नागपूरच्या विश्रूता चव्हाण हिने MH-CET -PCB ग्रूप मधून 97.64 पेरसेन्टईल गुण प्राप्त केले आहेत. ती रायसोनी जुनिअर कॉलेज, सुखली येथिल विद्यार्थिनी आहे. तसेच या सोबतच तिने वैद्यकीय प्रवेश करिता आवशक NEET ची ही परीक्षा उत्तम गुणाने उत्तीर्ण केली. तिने भविष्यात वैद्यकीय क्षेत्रातील एमबीबीएस अभ्यासक्रमात प्रवेश घेऊन सामाजिक सेवा, प्रशासकीय सेवेत जाण्याची इच्छा व्यक्त केली. विश्रूता चव्हाण ही महात्मा फुले विद्यालय मिलिंद नगर नागपूर येथील मुख्याध्यापिका प्रज्ञा चव्हाण तसेच मागासवर्गीय माध्यमिक शिक्षक संघटना नागपूर जिल्हाचे अध्यक्ष, राष्ट्रीय सर्वधर्म सद्भावना समिती नागपूरचे उपाध्यक्ष सदाशिव चव्हाण यांची कन्या आहे. विश्रूताच्या उत्कृष्ट शैक्षणिक यशाबद्दल मागासवर्गीय शिक्षक संघटनेचे संस्थापक प्रवीण मेश्राम, सचिव गोवर्धन पाटील, भैया गणवीर, धर्मराज पाटील, भगवान मडावी, रश्मी पाटील, मार्गदर्शक प्रा. सुभाष खाकसे यांनी तिचे कौतुक करून पुढील वाटचालीसाठी तिला शुभेच्छा दिल्या आहेत.

# आज जागतिक सिकल सेल जनजागृती शिबिर व कार्यशाळा

**नागपूर :** स्मृतीशेष संपत रामटेके पद्मश्री पुरस्कार प्राप्त सिकलसेल सोसायटी ऑफ इंडिया नागपूरचे संस्थापक यांच्या स्मृतीस वंदन करून जागतिक सिकल सेल जनजागृती शिबिर व कार्यशाळेच्या आयोजन करण्यात आले आहे. रविवार दि. 22 जून 2025 रोजी सकाळी दहा वाजता मोर भवन, झाशी राणी चौक सीताबर्डी नागपूर येथे सिकलसेल रुग्णांसाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. प्रमुख अतिथी डॉ. राहुल अरोडा हेमेटोलॉजिस्ट व (बीएमटी)बोन मॅरो ट्रान्सप्लांटेशन फिजिशियन, विशेष उपस्थिती डॉ. उदय बोधनकर सीनियर पीडियाट्रेशन नागपूर तसेच जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र प्रकल्प समन्वयक अभिजीत राऊत यांचे मार्गदर्शन ठेवण्यात आलेले आहे. बहार फाउंडेशन डॉ. अशोक उरकुडे तर्फे औषध वाटप केले जाणार आहे. सिकलसेल सोसायटी ऑफ इंडिया नागपूर संस्थेचे अध्यक्षा जया संपत



रामटेके तसेच संजीव गजभिये, निळकंठ पांडे, रातिराम टेंभूर्णे, प्रीती नगरारे, नरेश भांगे, राजरत्न रामटेके, सुदर्शन पाटील यांनी कार्यशाळेचा लाभ घेण्यासाठी रुग्णांना व पालकांना येण्याचे आवाहन केले.

# न्यू खरबी नगर येथे ज्येष्ठ पौर्णिमा साजरी

**नागपूर :** 'कही हम भूल न जाये' या उपक्रमांतर्गत प्रबुद्ध समाज समिती तारासावंगा शाखा विठ्ठलवाडी च्या वतीने ज्येष्ठ पौर्णिमेचा कार्यक्रम गुलचंद बौद्ध यांचे घरी न्यू खरबी नगर नागपूर येथे ज्येष्ठ पौर्णिमा निमित्ताने संपन्न झाला. सभेचे अध्यक्षस्थानी प्रबुद्ध समाज समितीचे अध्यक्ष पी. आर. धोंगडे होते. सभेचे संचालन वासुदेवराव डोंगरे यांनी केले. सर्वप्रथम महापुरुषांच्या फोटोंना पुष्पमाला अर्पण केल्यावर त्रिशरण पंचशील घेण्यात आले.

ज्येष्ठ पौर्णिमेचे महत्त्व या विषयावर धम्म प्रचारक सुनील लोखंडे बोलताना म्हणाले की, ज्येष्ठ पौर्णिमेच्या दिवशी तपस्सू आणि भल्लीक यांना तथागतांनी धम्मदीक्षा दिली. सुजातास धम्म उपदेश दिला आणि संघमित्राने याच पौर्णिमेच्या दिवशी बोधी वृक्षाची फांदी अनुरागपुर श्रीलंका येथे लावली. महेंद्रचे परिनिर्वाण याच पौर्णिमेच्या दिवशी वयाच्या 80 व्या वर्षी झाले. कार्यक्रमाचे दुसरे पाहुणे गुलचंद बौद्ध यांनी संत कबीर यांच्या जीवन व कार्यावरती प्रकाश टाकला. ते म्हणाले की, संत कबीर यांची जयंती आज आहे. कबीरांनी पाखंड, ढोंग आणि पंडित व



मुल्ला यांच्यावर प्रखर टीकास्त्र सोडले. 31 मे रोजी अहिल्याबाई होळकर यांची जयंती झाली. त्यानिमित्ताने त्यांच्या जीवन व कार्य संबंधीसुद्धा सुंदर माहिती दिली. दुसरे प्रमुख वक्ते कुशान लिंगायत म्हणाले की, त्रिशरण पंचशील आपण घराघरात कुटुंबासोबत दररोज पठण केले पाहिजे. तेव्हा मुलांवर चांगले संस्कार होतील. त्याची आज समाजाला अत्यंत गरज आहे त्याशिवाय भारत बौद्धमय होणार नाही.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष पी. आर. धोंगडे आपले भाषणात सविस्तरपणे बोलले. भगवान धरती आबा बिरसा मुंडा यांचा स्मृतिदिवस नऊ जूनला होता. त्या प्रित्यर्थ त्यांच्या जीवन व कार्यावर त्यांनी प्रकाश टाकला. ते पुढे म्हणाले की समाजामध्ये एकोपा असेल तरच यश मिळते. तेव्हा समाजामध्ये दुहीचे वातावरण निर्माण होऊ देऊ नये याची समाजाने काळजी घेतली पाहिजे. या कार्यक्रमात रमाकांत जाधव, नरेंद्र जांगळे, अनिल गरटकर, भास्कर मेश्राम व अजय फुलझेले यांची उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रंगारी दांपत्यांनी परिश्रम केले. रूपचंद नंदागवळी यांनी आभार प्रदर्शन केले. शेवटी अल्पोपहार आणि खीरदानने कार्यक्रमाची सांगता झाली.

# फुले, शाहू, आंबेडकराईट स्टडी सर्कल तर्फे

## 116 व्या प्रबोधनात्मक आज कार्यशाळा

**छत्रपती संभाजी नगर :** आपण सर्वांना याद्वारे कळविण्यात येत आहे की, 22 जून 2025 ला दुपारी 2.30 वाजता, फुले, शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे जनसंपर्क कार्यालय, 4, साकेत नगर (पेठे नगर), भावसिंगपुरा रोड, छत्रपती संभाजी नगर येथे 'मला कर्तृत्ववान माणसे पाहिजेत, त्यांच्या कर्तृत्वाबद्दल माझी खात्री झाली पाहिजे.' या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विधानाच्या 78 व्या वर्धापनदिनानिमित्त 116 व्या वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यशाळेला उद्घाटनर मार्गदर्शन जिल्हा व सत्र न्यायालयाचे ॲड. विजय सुरडकर तर मुव्हमेंट-21, चे प्रचारक देवाजी पाटील, नागपूर हे प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करणार आहेत. ही कार्यशाळा संचालक बी. बी. मेश्राम यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे. या कार्यशाळेला उपस्थित सर्व प्रतिनिधींना आपले मत व्यक्त करण्याची संधी दिली जाणार आहे. तरी आपले मत पटवून देण्यासाठी व इतरांची मते समजून घेण्यासाठी आपण मित्र परिवारासह उपस्थित राहिले पाहिजे. असे फुले, शाहू, आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने कळविण्यात आले आहे.

# रिपब्लिकन लोकशाही आघाडी स्थापन

**नागपूर :** रिपब्लिकन सोलाडीरिटी मूव्हमेन्ट आणि राष्ट्रीय एकता आंदोलनद्वारा शोषित, वंचित समूहाचे प्रश्न सोडविण्यासाठी रिपब्लिकन व विविध सामाजिक संघटनाची संयुक्त बैठक अरुण गाडे, कामगार नेते यांचे अध्यक्षतेखाली रविभवन कॉन्फरन्स हॉल येथे झाली. सभेला जेष्ठ रिपब्लिकन नेते विनायकराव जामगडे, आंबेडकरी चळवळीतील जेष्ठ नेते जनार्दन मुन, प्रसिद्ध आंबेडकरी विचारवंत डॉ. एन. व्ही. ढोके, संयुक्त रिपब्लिकन आघाडीचे अमृत गजभिये, रिपब्लिकन लोकशाही मोर्चाचे घनश्याम फुसे, प्रसिद्ध आंबेडकरी प्रभोधनकार अनिरुद्ध शेवाळे, संविधान परिवारचे प्रा. राहुल मुन, भीम आर्मीचे संजय फुलझेले, राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे प्रा. रमेश पिशे यांनी मार्गदर्शन केले.



मुख्य मार्गदर्शन करतांना विनायकराव जामगडे म्हणाले, देशात अराजक स्थिती आहे, परिवर्तन करायचे असेल तर सर्व समावेशक असलेला आंबेडकरी विचार सर्वांनी स्वीकारणे आवश्यक असल्याचे म्हणाले. डॉ. एन. व्ही. ढोके म्हणाले, रिपब्लिकन म्हणजे शोषित, वंचित सर्वहारा समाजाचे प्रतिनिधित्व करणारा विचार म्हणजे रिपब्लिकन सर्व गट तट विसरून एकत्र लढा द्या. अमृत गजभिये म्हणाले, निष्ठावान माणसे असली तर चळवळ उभी होईल आणि निश्चितपणे यश मिळेल. प्रा. रमेश पिशे म्हणाले, ओबीसी, आदिवासी, बंजारा व सर्व वंचित समूह एकजुटीसाठी प्रयत्न होणे गरजेचे असल्याचे म्हणाले. यावेळी समावेशक रिपब्लिकन लोकशाही आघाडी स्थापन करण्यात आली. रिपब्लिकन लोकशाही आघाडीचे निमंत्रक अरुण गाडे यांची एकमताने निवड झाली. तर संयोजक पदी घनश्याम फुसे, राष्ट्रीय मुस्लिम परिषदचे प्रा. जावेद पाशा, प्रा. रमेश पिशे, दिनेश गोडघाटे, प्रा. राजेंद्र टेंभूर्णे, संजय फुलझेले, प्रा. मधुकर उईके, प्रा. राहुल मुन, प्रसेंजित ताकसांडे, प्रा. अनिल भांगे, संजय पाटील, श्यामराव हाडके, बिश्वास पाटील, प्रमोद रामटेके, एकनाथ ताकसांडे, शेषराव गणवीर, संजय अंभोरे, राजेश ढेंगरे, गौतम ढेंगरे, अशोक निमसरकर, डॉ. जयप्रकाश बोधी, अरविंद पाटील, गोपाल पवार, डॉ. सी. जी. जनबंधू, मनोज खुर्वे, कैलास बोंबले, बी. एन. बांबोळे, हेमचंद उके, सुरेश कन्नाके, श्रीकांत माळवी, स्वयंभर मेश्राम, तुळशी मदामे यांची निवड करण्यात आली. प्रचार प्रमुख, डॉ. एन. व्ही. ढोके आणि अनिरुद्ध शेवाळे तर मार्गदर्शक म्हणून विनायकराव जामगडे, अमृत गजभिये, जनार्दन मुन, प्रा. डॉ. एन. व्ही. ढोके, संवाद समिती प्रा. रमेश पिशे, अनिरुद्ध शेवाळे, वा. का. खोब्रागडे यांची निवड करण्यात आली. अरुण गाडे यांनी भूमिका व अध्यक्ष भाषण करतांना मनपा निवडणुकीत ओबीसी, आदिवासी आणि रिपब्लिकन जनतेनद्वारा एकास एक उमेदवार देण्यासाठी सर्व समविचारी पक्ष व संघटनासोबत संवाद केला जाईल संचालन व आभार अनिरुद्ध शेवाळे यांनी केले.


## जाहिरात



प्रॉपर्टी घेणे विकणे भाड्याने देणे अधिक माहिती करिता

संपर्क
९३२५६२९६३५


# आशा वर्कर व गटप्रवर्तक यांना थकीत केंद्राचे मानधन त्वरित द्या !

**नागपूर :** आशा व गटप्रवर्तक कर्मचारी युनियन (सीआयटीयु) नागपूर जिल्हा तर्फे पत्रपरिषद घेण्याचा उद्देश म्हणजे आशा वर्कर व गटप्रवर्तक यांचेवर केंद्र व राज्य सरकारने निर्माण केलेले संकट. आशा वर्कर व गटप्रवर्तक यांना जानेवारी 2025 पासून केंद्राचे कोणतेही मानधन मिळालेले नसुन राज्य किंवा जिल्हा प्रशासन सकारात्मक उत्तर द्यायला तयार नाही. राज्य शासनाचे सुद्धा मानधन मार्च 2025 पासून थकीत असून त्यावर सुद्धा राज्य शासन तोडगा काढायला तयार नाही. अशा परिस्थितीमध्ये आशा वर्कर वर विविध प्रकारचे सर्वे ऑनलाइन करून देण्याच्या दबाव व परिवारावर आलेली उपासमारीची पाळी त्यामध्ये त्या संकटात सापडलेल्या आहेत. वरिष्ठ अधिकारी किंवा कर्मचारी आशा वर्कर व गटप्रवर्तक यांचेवर कामाचा ताण देत असून त्या विविध रोगाने ग्रस्त झालेले आहेत. 13 जुन 2025 रोजी, आरोग्य सेवा व आयुक्त अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान यांच्यातर्फे परिपत्रक क्रमांक राआअ/आशा/आशा अद्यावत मा.सु./(27109-314 काढण्यात आले. वरील परिपत्रकात आशा स्वयंसेविका ही शासकीय कर्मचारी किंवा कंत्राटी कर्मचारी नसून ही स्वयंसेविका म्हणून कार्यरत आहे असे वरील पत्रात नमूद केलेले आहे. विधवा, घटस्फोटित किंवा आर्थिक दृष्ट्या दुर्बल असलेल्या विवाहित महिलांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्याच्या दृष्टिकोनातून नेमणूक करण्यात आली. परंतु नेमणूक करतांना




अधिक शिक्षणाला महत्त्व देण्यात येत आहे. त्यामुळे गरजू महिलांना लाभांपासून वंचित राहावे लागते. स्वयंसेविका ही जेव्हापर्यंत काम करण्यास सक्षम असेल तेव्हापर्यंत तिला काम करण्याची मुभा आहे. परंतु नवीन परिपत्रकामध्ये राष्ट्रीय आरोग्य अभियान महाराष्ट्र तर्फे आशावर स्वयंसेविका यांची वयोमर्यादा 60 वर्ष निश्चित केली आहे. स्वयंसेविका म्हणून काम करणाऱ्या आशा वर्कर यांना वयोमर्यादा कोणत्या आधारावर लागू होते? अल्प मानधनावर काम करणारी आशा स्वयंसेविका त्या मानधनावर त्यांच्या प्रपंच योग्यप्रकारे चालू शकत नाही तर कार्य समाप्तीनंतर उपजीविका कशी चालवणार? आशा स्वयंसेविका यांच्यावर 60 वर्षाची वयोमर्यादा लादल्या जात असेल तर, शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा द्यावा. अन्यथा कार्य समाप्तीनंतर 5 लाख रुपये एक मुस्त राशी व 10 हजार रुपये मासिक पेन्शन लागू करावे. अशी मागणी आशा व गटप्रवर्तक कर्मचारी युनियन (सीआयटीयू) तर्फे कॉ. राजेंद्र साठे व कॉ. प्रीती मेश्राम यांच्यातर्फे पत्रकार परिषदेत करण्यात आली आहे. वारंवार मुख्यमंत्री, महसूल मंत्री, अर्थमंत्री, आरोग्य मंत्री यांच्याशी वारंवार पत्रव्यवहार व संवाद केल्यानंतर सुद्धा कोणताही ठोस निर्णय घेतल्या जात नाही. जे एस वाय अंतर्गत आशा वर्कर यांच्यावर लादण्यात आलेली एपीएल / बीपीएल ची अट रद्द करून सरसकट मोबदला देण्यात यावा अशी मागणी करण्यात आली. शासनाने तात्काळ निर्णय न घेतल्यास परत एकदा आशा वर्कर व गटप्रवर्तक संपावर जाण्याची संभावना व्यक्त करण्यात येत आहे. परिषदेत कॉ. राजेंद्र साठे, प्रीती मेश्राम, लक्ष्मी कोत्तेजवार, रंजना पौनीकर, माया कावळे, सोनम सोनवणे, सुनीता पकिडे उपस्थित होते.


## स्टुडिओ किरायाने देणे आहे



दैनिक बहुजन सौरभने एक उत्कृष्ट दर्जाचा स्टुडिओ तयार केलेला आहे. बेरोजगार विद्यार्थ्यांसाठी एक आठवड्याचा मोफत कोर्स करण्याचा मानस आहे. ज्या कोणाला नाटक, गाणी, कराओके किंवा फेसबुक रिलवर टाकणारी कोणतीही माहितीसाठी स्टुडिओचा वापर करायचा असल्यास तासाप्रमाणे भाड्याने देणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क साधावा.



मो. 8482839451



बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. **RNI No. MAHMAR 2020/84035** Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648